१९२७३
ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. नं. ४६५

भार[redacted]

# शकुंतला व दमयंती

यांचीं हीं चरित्रें

रा. रा. दत्तात्रय गोपाळ लिमये बी. ए.

यांनीं

मूळ महाभारतावरून मराठींत लिहिलीं.

प्रकाशक—सार्थप्रकाशक, ७१५ सदाशिव पेठ, पुणें शहर.

मुद्रक—शंकर नरहर जोशी, चित्रशाळा स्टीम-प्रेस,

८१८ सदाशिव पेठ पुणें.

१२ इसवी.

REFBK-0000860

किंमत ४ आणे.

# शकुंतला-चरित्र

पौरव वंशांत दुष्यंत नांवाचा महापराक्रमी राजा होऊन गेला. त्याची सत्ता देशाचे सर्व समुद्र-किनाऱ्यांपर्यंत पसरली होती. त्याचे राज्यांतील सर्व चतुर्वर्णी प्रजा आपापलीं कर्तव्यें निरपेक्षतेनें करीत असत. त्याचे राज्यांत वेळचे वेळीं पाऊस [illegible]य-धान्यें सकस निपजत; आणि धन, रत्नें व पशु यांचीही [illegible] ज्यांत समृद्धि असे. त्याचे प्रजाजनांस चोरांचें, दुष्काळाचें, [illegible]चें बिलकूल भय नसे. स्वतः राजाही तरुण, धर्मनिष्ठ, [illegible]ल व बलवान् असा होता. विष्णूसारखें बल, सूर्या-[illegible], समुद्रासारखी शांतता व गांभीर्य आणि पृथ्वीसारखी [illegible] हे सद्गुण त्याचे अंगीं एकवटले होते. (आ०अ०६८)

[illegible]वशीं दुष्यंत राजा चतुरंग सैन्य आणि शिकारीचे [illegible]ी बरोबर घेऊन मृगयेस निघाला. राजधानीच्या राज-[illegible]त्तीवरून तो जात असतां प्रजाजन दुतर्फा उभे राहून [illegible] देत त्याचा जयजयकार करीत होते; आणि खिडक्यां-[illegible]च्यांवरून स्त्रिया त्याजवर पुष्पवृष्टि करीत होत्या. या-[illegible]जधानींतून बाहेर पडल्यानंतर रथांतून कांहीं वेळ प्रवास [illegible] एक मोठें निर्जन व निर्जल अरण्य त्यास लागलें. त्यांत [illegible], कवठी, अर्क, (रुई) धाव इ० झाडें गजबजून गेलीं [illegible] पर्वतांवरून कोसळ[illegible] ठांनीं तें दुर्गम

REFBK-0000860

झालें होतें; सिंह, वाघ व इतर क्रूर श्वापदें यांनींही तें भरले
अशा प्रकारच्या वनांत शिरून दुष्यंत सैन्यासह शिव
लागला. त्यानें अनेक वाघ, हरिणें व इतर जंगली जनावरें
हरणांचे कळप ओरडत भीतीनें सैरावैरा धावूं लागले.
भुकेनें जर्जर होऊन भूमीवर पडलेले असे कित्येक
भुकेलेल्या वाघांनीं खाऊन टाकले. शिकारी लोकांच्या
जखमा झाल्यामुळें क्रुद्ध होऊन रानहत्तींनीं दुष्यंताचे कांह
पायांखालीं तुडवून मारले; कांहींनीं भुकेनें व्याकुळ होऊ
शेकोटीवरच भाजून कुटून खाल्लें. ( आदि०अ०६९ )

याप्रमाणें मृगया करून हजारों श्वापदें मारल्यानंतर
मृगाचा पाठलाग करीत असतां एक मोठें ओसाड मैदान
दुष्यंतराजा दुसऱ्या वनांत शिरला. ह्या वनांत अनेक
लहान मोठे वृक्ष असून ते फुलांनीं गजबजले व फळां
होते; कोकिलादि अनेक पक्ष्यांच्या, झिल्लीनामक कि
भ्रमरांच्या शब्दांनीं तें वन भरून गेलें होतें; आणि मंद,
सुगंधित वारा सर्वत्र वाहत होता. मोठमोठ्या वृक्षांची द
छाया पडली होती; व हे वाऱ्यानें हालले म्हणजे त्यांच्या
खालच्या सावलींत पुष्पशय्याच बनत असत. कांहीं
वृक्ष उंच ध्वजासारखे दुरून दिसत. ठिकठिकाणीं हिरव
कोवळ्या गवतांनीं जमीन व्यापलेली होती; व ठायीं ठा
गृहेंहीं बांधलीं होतीं. अशा प्रकारचें मालिनी
तीरीं असलेलें हें रम्य वन पाहून दुष्यंतराजाची
हरली. या वनांत आणखी प्रवेश केल्यावर हें ऋषींच
आश्रमांनीं वेष्टिलेलें तपोवन आहे, असें त्यास दिसू

नदीतीरास लागून ऋषींचे अनेक आश्रम वसले असून मालिनी नदी, आलिंगन देणाऱ्या मातेप्रमाणें त्या आश्रमांस वळसा घालून वाहत होती! नदीमध्यें लहान बेटें अनेक असून तिचें पाणी स्वच्छ, शीतळ व पवित्र होतें; आणि तिच्या विस्तीर्ण वाळवंटावर चक्रवाक व मोर यांचे थवे हिंडत होते. रानहत्तींचे व हरणांचे माण-साळलेले कळप इतस्ततः संचार करीत होते. अशा प्रकारचें तें मनोहर तपोवन पाहून ऋषींचें दर्शन घेण्याची राजाला उत्कंठा झाली. त्यानें तपोवनाचे बाहेरच आपलें सर्व सैन्य ठेवलें; आणि आपलीं सर्व राजभूषणें काढून विनयपूर्वक साध्या पोषाखानेंच कांहीं अमात्य व पुरोहित एवढीच मंडळी बरोबर घेऊन राजानें आश्रमांत प्रवेश केला. जप-होम करणारे तपस्वी, यज्ञयाग करणारे मुनि, चतुर्वेदांचें अध्ययन करणारे ऋषि व इतर अनेक शास्त्रांचा अभ्यास करणारे ब्राह्मण यांच्या गंभीर ध्वनीनें तो आश्रम दुम-दुमून गेला होता. हे सर्व आश्रम, ठिकठिकाणीं मांडलेलीं विचित्र आसनें, व देवालयें पाहून झाल्यानंतर दुष्यंतराजा अमात्य व पुरो-हित यांस तेथेंच ठेवून एकटाच कश्यपपुत्र कण्वऋषि यांच्या आश्रमाकडे निघाला. हा आश्रम इतरांपासून कांहींसा दूर, एकांत व विशेष रम्यस्थलीं वसला होता. ( आदि० अ० ७० )

दुष्यंत राजा कण्वऋषींच्या आश्रमांत जाऊन पाहतो तों त्यास तेथें कोणींही दिसेना, कण्वऋषिही तेथें दृष्टीस पडेनात. तेव्हां ( क इह ) ‘ येथें आश्रमांत कोण आहे ? ’ असा त्यानें मोठ्यानें प्रश्न केला. राजाचा हा शब्द ऐकून एक तापसी वेष धारण केलेली पण तरुण व अत्यंत सुस्वरूप कन्या—ह्या आश्रमाची जणूं मूर्तिमंत लक्ष्मीच—‘ स्वागतं ते ’ ( तुमचें स्वागत असो ) असें म्हणत

बाहेर आली ! तिनें राजाचें यथोचित स्वागत करून त्यास बसा- यास आसन दिलें, व अतिथीस योग्य अशी त्याची पूजा करून त्यास कुशल प्रश्न विचारले. ‘ कण्वऋषींच्या दर्शनास मी आलों आहें, ते कोठें आहेत ? ’ असा दुष्यंतानें कन्येला प्रश्न विचारला. तेव्हां ‘ माझा पिता फळें आणण्यासाठीं वनांत गेला आहे; घटका- भर थांबा, म्हणजे तुम्हास त्यांचें दर्शन होईल. ’ असें शकुंतलेनें त्यास उत्तर दिलें. शकुंतलेचें तें अद्वितीय रूप, यौवन, विशेषतः तपानें व मनोनिग्रहानें आलेलें अपूर्व तेज हीं पाहून राजाचें मन तिजवर तात्काल बसलें. आणि, ‘ ती कोणाची कोण व येथें आश्रमांत कां राहिली आहे ’ हें जाणण्याची इच्छा त्यानें प्रदर्शित केली. तेव्हां ‘ मी कण्वाची मुलगी आहें, ’ असें शंकुतलेनें हसत हसत हळूच उत्तर केलें. कण्वऋषि हे नैष्ठिक ब्रह्मचारी असून त्यांची ही कन्या कशी ? हे ऋषि आपल्या व्रतापासून केव्हांही ढळणार नाहींत; तेव्हां त्यांस ही मुलगी कशी होणार ? ’ असे संशय दुष्यंताचे मनामध्यें आले; व ते त्यानें शकुंतलेस बोलूनही दाखविले. तेव्हां पूर्वीं एके प्रसंगीं कण्वऋषींनीं दुसऱ्या एका ऋषींस सांगित- लेलें आपलें पूर्ववृत्त तिनें दुष्यंतास निवेदन केलें.

ती म्हणाली:-- “ पूर्वीं विश्वामित्रऋषि घोर तपश्चर्या करूं लागले, त्यामुळें इंद्राचे मनांत मोठी भीति उत्पन्न झाली. त्यांचे तपांत विघ्न आणून त्यांस तपोभ्रष्ट करण्याचे कामीं इंद्रानें मेनका अप्सरेची योजना केली. परंतु विश्वामित्रऋषींचा तपःप्रभाव व कोपिष्ठ स्वभाव तिला माहीत असल्यामुळें, ‘ आपण त्यांजसमोर जाऊन शृंगारचेष्टा करूं लागल्यास रागानें शाप देऊन कदाचित् ते आपणांस भस्मच करून टाकतील ’ अशी तिला भीति वाटली. परंतु

इंद्रानें तिचे मदतीस वायु, मदन वगैरे देऊन तिच्या संरक्षणाची पुरती तजवीज केली; व तिला विश्वामित्राकडे पाठविलें. ( आदि०अ०७१ ) विश्वामित्र हिमालय पर्वतावर मालिनी नदीचे तीरानजीकचे आश्रमांत तपश्चर्या करीत होते. तेथें जाऊन मेनका नदीमध्यें जलक्रीडा करूं लागली; तोंच वाऱ्यानें तिचें तीरावर ठेवलेलें शुभ्र वस्त्र उडवून दूर नेलें. तेव्हां ती गोंधळून जाऊन व लज्जित होऊन तशीच नदींतून विश्वामित्रांचे आश्रमाकडे आली. तिचें सुरूप, तारुण्य, कंठमाधुर्य, शृंगारचेष्टा व सस्मित भाषणें यांचा विश्वामित्रासारख्या कडकडीत तपोनिष्ठ मुनीवरही परिणाम होऊन त्याचें मन अनावर झालें. मालिनी नदीचे तीरीं दोघांनीं अनेक दिवस क्रीडा व विलास केले. शेवटीं विश्वामित्रापासून झालेली कन्या मालिनीचे तीरावर टाकून कृतकार्य होत्साती मेनका इंद्रलोकीं गेली. इकडे त्या तान्ह्या कन्येभोंवतीं जमून शकुंतपक्षी तिचें संरक्षण व पोषण करीत होते. कांहीं काळानें कण्वऋषि नदीवर स्नानास गेले असतां ती कन्या त्यांचे दृष्टीस पडली. तिला त्यांनीं आश्रमांत आणली, व आपल्या औरस कन्येप्रमाणें तिचें पालनपोषण केलें. कण्वऋषींनीं नदीवरून जी कन्या आणली ती मीच होय. निर्जन अरण्यांत 'शकुंत' पक्ष्यांनीं माझें संरक्षण केलें म्हणून त्यांनीं माझें नांव 'शकुंतला' असें ठेवलें; आणि तेव्हांपासून ते माझें पोटच्या मुलीप्रमाणें लालनपालन व पोषण करीत आहेत; व मीही त्यांस पित्याप्रमाणेंच मान देत आहें. कारण—

शरीरकृत्प्राणदाता यस्य चान्नानि भुंजते ।
क्रमेणैते त्रयोऽप्युक्ताः पितरो धर्मशासने ॥

जन्मदाता, प्राणदाता व अन्नदाता हे एकाखालच्या एक योग्यतेचे तीन पितेच होत, असें धर्मशास्त्राचें वचन आहे." ( आदि० अ० ७२ )

शकुंतलेच्या तोंडची ही हकीकत ऐकून दुष्यंतास फार आनंद झाला. शकुंतला ही कण्वकन्या—ब्राह्मणाची मुलगी—नसून राजकन्या आहे, हें त्याचे ध्यानांत आलें. 'माझे सर्व राज्याची तूंच स्वामिनी हो; व मजशीं गांधर्व विवाह कर' असें म्हणून त्यानें तिला आपलें मनोगत कळविलें. शकुंतलेचें जरी राजावर मन बसलें होतें, तरी त्याच्या या म्हणण्यास ती कबूल होईना. 'माझा पिता फलें आण्यास गेला आहे; तुम्ही क्षणभर थांबा. तो आल्यावर तुम्ही त्याजपाशींच माझी मागणी करा, म्हणजे तोच मला तुमचे स्वाधीन करील' असें ती म्हणूं लागली. परंतु दुष्यंत राजास कण्व येईपर्यंत वाट पाहणें इष्ट वाटलें नाहीं. किंबहुना कण्वांचें दर्शन घेण्यासंबंधाचें आपलें पहिलें बोलणें विसरून 'मी केवळ तुझ्याकरितांच येथें थांबलों आहें' असेंही त्यानें या वेळीं तिला सांगितलें! त्यानें धर्मशास्त्रांत सांगितलेल्या आठ विवाह-पद्धतींचें तिजपाशीं वर्णन केलें. या आठांपैकीं पैशाच व आसुर हे विवाह अधर्म्य आहेत; ब्राह्म, दैव, आर्ष व प्राजापत्य हे पहिले चार विवाह ब्राह्मणांस उक्त असून राक्षस व गांधर्व हे विवाह क्षत्रियांस विहित आहेत, असें त्यानें तिला सांगितलें. तेव्हां शकुंतला म्हणाली:—'गांधर्व विवाह धर्म्य असेल, व स्वतःचें दान करण्यास स्वतःचे देहावर जर माझें स्वामित्व असेल तर मी गांधर्व विवाह करण्यास तयार आहें; मात्र माझे पोटीं होणारा पुत्र तुमचे सिंहासनाचा—राज्याचा—वारस व युवराज झाला पाहिजे. ही अट



माझ्या सर्व राज्याची तूंच स्वामिनी हो व मजशीं गांधर्व विवाह कर.

पृष्ठ ६.

तुम्हांस मान्य असेल, तर मी तुमचे म्हणण्यास कबूल आहें.' शकुंतलेची ही अट दुष्यंतानें विचार न करितां एकदम कबूल केली, व तिजशीं गांधर्व विवाह केला. 'राजधानीस परत गेल्यावर मी चतुरंग सैन्य पाठवून तुला सन्मानपूर्वक घेऊन जाईन' असें परत जातांना त्यानें तिला वचनही दिलें. क्षत्रियांचा गांधर्व विवाह जरी धर्मशास्त्रसंमत असला तरी कण्वऋषींचे अपरोक्ष आपण अननुभवी शकुंतलेचें मन वळवून व कोणाची सल्ला घेण्याचीही तिला संधि न देतां तिजशीं घाईनें केलेलें हें लग्न गैरशिस्त होय, असें दुष्यंताचे मनास खातच होतें; व म्हणूनच तो कण्वऋषि परत येण्यापूर्वींच त्वरेनें राजधानीस निघून गेला. राजधानीस पोंचेपर्यंत आपल्या ह्या अविचाराच्या कृत्याचें वर्तमान ऐकून महान् तपस्वी कण्वऋषि आपणास काय करतील कोण-जाणे, असे विचार त्याचे मनांत सारखे घोळत होते. असो;

दुष्यंत आश्रमांतून गेल्यानंतर लवकरच कण्वऋषि परत आले. पण या वेळीं नेहमींप्रमाणें पुढें येऊन, आपल्या पित्याचे जवळून फळें घेऊन उतरून ठेवणें व त्यांचा सत्कार करणें, वगैरे गोष्टी लाजून गेल्यामुळें शकुंतला करीना. पण कण्वऋषींस सर्व प्रकार अंतर्ज्ञानानें कळून चुकला होता. '**मला न विचारतां माझे अपरोक्ष केलेलें हें कृत्य माझा—पित्याचा-अनादर करणारें आहे**, तरी तें धर्म्य आहे' असें त्यांनीं तिला सांगितलें, एवढेंच नव्हे तर शकुंतलेस होणारा पुत्र मोठा बलाढ्य चक्रवर्ती होईल, असाही त्यांनीं तिला आशीर्वाद दिला. दुष्यंतराजा धर्मात्मा, महात्मा व उत्तम पुरुष आहे असेंही ते म्हणाले. तेव्हां शकुंतलेचा संकोच दूर होऊन तिनें सर्व गोष्टी त्यांजपाशीं कबूल केल्या; व

दुष्यंतावर—आपल्या पतीवर—कृपादृष्टि असावी, अशी तिनें त्यांस विनंति केली. कण्वऋषींनीं दुष्यंतासाठीं तिला वर देऊं केला; तेव्हां ' सर्व पौरव राजे सदैव धर्मनिष्ठ राहोत, व ते राज्यभ्रष्टही कधीं न होवोत ' असा **धर्मनिष्ठ व स्वाभिमानी पतिव्रतेस साजेल असा वर तिनें मागून घेतला.** ( आदि० अ० ७३ )

शकुंतलेस वचन देऊन दुष्यंत हस्तिनापुरास परत गेल्यानंतर तीन वर्षें तिचे पोटांत गर्भ वाढून नंतर ती प्रसूत झाली व तिला तेजस्वी पुत्र झाला. त्याचे शरीराबरोबरच त्याचें रूप, बुद्धिमत्ता, औदार्यादि सद्गुणांची वृद्धि होऊं लागली. कण्वऋषींनीं त्याचे जातकर्मादि संस्कार विधिपूर्वक करविले. त्याचें डोकें मोठें होतें; त्याचें मुख अत्यंत तेजस्वी असून त्याचे दांत पांढरे शुभ्र, कोंवळे व अणकुचीदार होते; व त्याचे हातावर चक्रचिन्हें होतीं. असा हा सुलक्षणी राजपुत्र त्या तपोवनाच्या पवित्र व मोकळ्या वातावरणांत झपाट्यानें वाढूं लागला. हा मुलगा सहा वर्षांचा झाला नाहीं, तोंच तो अरण्यांतील सिंह, व्याघ्र, रानडुकरें, रानरेडे, हत्ती वगैरे पशु पकडून आणून झाडांस बांधून टाकी; त्यांचे पाठीवर बसून व त्यांस आपल्या कह्यांत आणून त्यांशीं खेळे, आणि त्यांस चोहोंकडे फिरवी ! ' सर्व ' हिंस्र पशूंस हा कह्यांत आणूं लागला ( दमयति ) म्हणून आश्रमांतील ऋषींनीं त्याचें नांव ' **सर्वदमन** ' असें ठेवलें. दुष्यंतपुत्राचा हा पराक्रम पाहून तो यौवराज्याभिषेकास योग्य झाला, असें कण्वानीं शकुंतलेस सांगितलें व तिला मुलासह हस्तिनापुरास पाठविण्याचीही त्यांनीं तयारी केली. त्यांनीं आपल्या शिष्यांस सांगितलें कीं,

नारीणां चिरवासो हि बांधवेषु न रोचते ।
कीर्तिचारित्र्यधर्मघ्नस्तमान्नयत मा चिरम् ॥

"माहेरीं फार दिवस राहणें पतिव्रता स्त्रियांस आवडत नाहीं; कारण त्यामुळें त्यांची कीर्ति, पातिव्रत्य व धर्म यांस काळिमा लागण्याचा संभव असतो. यासाठीं शकुंतलेला बरोबर नेऊन तिला राजपुत्रासह त्वरित दुष्यंताकडे पोंचवा." या आज्ञेप्रमाणें कण्वशिष्यांनीं शकुंतला व तिचा पुत्र यांस दुष्यंताकडे राजसभेंत नेऊन पोंचविलें, व ते आश्रमास परत आले.

शकुंतलेनें, सात वर्षांपूर्वीं कण्वाश्रमांत घडलेल्या गोष्टीची व त्या वेळीं दिलेल्या वचनाची दुष्यंतास आठवण दिली; आणि या पुत्रास आतां यौवराज्यभिषेक करा, असेंही त्यास सुचविलें. शकुंतलेनें सांगितलेल्या गोष्टींचें स्मरण असूनही मुद्दाम दुष्यंत राजा तिला म्हणाला:—'अगे, दुष्ट तापसी! तूं कोणाची कोण आहेस? तूं सांगितलेल्या गोष्टीचें किंवा तुजशीं धर्म, अर्थ, काम या बाबतींत कसलाही माझा संबंध असल्याचें मला स्मरत नाहीं. तूं येथून निघून जा किंवा जाऊं नकोस, अगर तुला वाटेल तें कर.' दुष्यंताचें हें कठोर भाषण ऐकून बिचारी शकुंतला लज्जेनें व दुःखानें भान नाहींसें होऊन दगडी पुतळीप्रमाणें स्तंभित व निश्चल होऊन गेली! एकीकडे संताप व दुःख आणि दुसरीकडे त्यांस आंवरणारा विवेक यांची झटापट तिचे हृदयांत सुरू झाली; तिनें आपलें तपःसामर्थ्याचें तेजही आवरून धरलें. परंतु, क्षणभर विचार केल्यानंतर रागानें व आवेशानें तिचे ओंठ कांपूं लागले व डोळेही लाल झाले. अशा स्थितींत दुष्यंताकडे फेंकलेल्या एका वांकड्या कटाक्षानें जणूं त्याचें हृदय जाळीतच शकुंतला त्यास

म्हणालीः—" महाराज, खरें काय व खोटें काय हें तुमचें मन पूर्णपणें जाणतच आहे. आपण सर्व गोष्टी माहीत असूनही ' मी कांहीं जाणत नाहीं, ' असें एकाद्या सामान्य माणसासारखें असत्य भाषण कां करतां ?

**योऽन्यथा संतमात्मानमन्यथा प्रतिपद्यते ।**
**किं तेन न कृतं पापं चौरेणात्मापहारिणा ॥**

**जो आपलें खरें स्वरूप झांकून आपण भलतेच आहों असें दाखवितो, त्या आत्मवंचक चोरानें कोणतें पातक करावयाचें ठेवलें आहे ? मला कोणीं पहात नाहीं व माझें खरें मनोगत कोणास ठाऊक नाहीं, अशा बुद्धीनें मनुष्य पाप करण्यास प्रवृत्त होतो; पण सर्वांच्या हृदयांत वास करणारा अंतरात्मा, तसेंच पृथ्वी-आकाश, दिवस-रात्र, चंद्र-सूर्य, वायु-अग्नि, यमधर्म हे मनुष्याच्या सर्व बऱ्यावाईट कृत्यांचे साक्षी असतात.** ही आपण होऊन आपल्याकडे आली, असें समजून माझी उपेक्षा करूं नका. मी आपण होऊन आलेली असलें तरी तुमची पतिव्रता भार्या—सहधर्मचारिणी—आहे. असें असूनही भरराजसभेमध्यें यःकश्चित् सामान्य पुरुषाप्रमाणें माझा कां उपमर्द करतां ? तुम्हीं माझें बोलणें मुळींच ऐकत नाहीं, यावरून माझें हें बोलणें अरण्यरोदनच झालें म्हणावयाचें ?" याप्रमाणें विलाप करीत बोलत असतांही तिकडे कोणी लक्ष देत नाहीं, असें पाहून शकुंतलेचा राग क्षणभर अनावर होऊन ती अत्यंत त्वेषानें म्हणालीः— ' मी दीनपणानें याचना करीत असतांही जर तुम्ही माझा स्वीकार करणार नाहीं, तर त्यामुळें तुमच्या मस्तकाचे आज शतशः तुकडे

होतील, असा माझा शाप आहे!' पण पुनः कांहींशी शांत होऊन ती म्हणालीः—" तुम्हीं माझा व या पुत्राचा त्याग करण्याचा अविचार करूं नका. कारण—

अर्धं भार्या मनुष्यस्य भार्या श्रेष्ठतमः सखा ।
भार्या मूलं त्रिवर्गस्य भार्या मूलं तरिष्यतः ॥
भार्यावंतः क्रियावंतो भार्यावंतः श्रियान्विताः ।
भार्यावंतः प्रमोदंते सभार्या गृहमेधिनः ।
सखायाः प्रविविक्तेषु भवंत्येताः प्रियंवदाः ।
पितरो धर्मकार्येषु भवंत्यार्तस्य मातरः ॥

पुरुषाचें भार्या हें अर्धें शरीर आहे; व भार्या हाच अत्यंत श्रेष्ठ मित्र होय. धर्मार्थकाम या तीन पुरुषार्थांचें मूळ व संसारसागर तरून जाण्याचें साधनही भार्याच आहे. धर्मपत्नीसह संसार करीत असलेल्या पुरुषांसच वैभव प्राप्त होतें, तेच कृतकृत्य होत व तेच विश्वासास पात्र होत. भार्या ही एकांतांत मधुर भाषण करणाऱ्या मित्राप्रमाणें, धर्मकार्यांत वाडवडिलांप्रमाणें व आजारांत मातेप्रमाणें उपयोगीं पडत असते. पतीवर कोणतेंही व केवढेंही संकट येवो, त्या वेळींही त्याचा त्याग न करणारी अशी एक भार्याच होय. आधीं मृत्यु आल्यास परलोकीं पतीची वाट पाहणारी व पति आधीं मरण पावल्यास त्याचेबरोबर सहगमन करणारी भार्येवांचून कोण आहे? भार्या ही इहपरलोकीं पतीची 'सहचारिणी' होते, हेंच 'पाणिग्रहणा' चें मुख्य रहस्य आहे.

आत्माऽऽत्मनैव जनितः पुत्र इत्युच्यते बुधैः ।
तस्माद्भार्यां नरः पश्येन्मातृवत् पुत्रमातरम् ॥

**पति भार्येचे ठिकाणीं पुत्ररूपानें स्वतःच जन्म घेत असतो; यासाठीं पुरुषांनीं आपल्या पुत्राचे आईला ( स्वभार्येला ) आपल्या स्वतःच्या मातेइतकाच मान द्यावा,** अशीं शास्त्रवचनें आहेत. पुरुषाच्या शारीरिक व मानसिक व्याधि शमविण्याचें सामर्थ्य भार्येमध्यें मात्र आहे. सुख, प्रेम व धर्म हीं तिन्ही भार्येवर अवलंबून असल्यामुळें क्रोध आला असतांही पुरुषांनीं पत्नीस दुःख देऊं नये. आरशांत स्वतःचें प्रतिबिंब पाहणें, त्याप्रमाणें भार्येचे पोटीं पुत्ररूपानें पुनः जन्मलेल्या स्वतःलाच पाहणें, यासारखी आनंदाची दुसरी कोणती गोष्ट आहे बरें? '**पुन्नामक**' नरकांतून पितरांची मुक्तता करतो म्हणूनच मुलास 'पुत्र' म्हणत असतात, असें ब्रह्मदेवाचें वचन आहे. **पुत्रामुळेंच पुरुषास उत्तम लोक प्राप्त होत असतो.** धुळीनें अंग भरलेल्या मुलानें पुढें येऊन बापास नमस्कार करून आलिंगन दिलें असतां त्यास जें स्पर्शसुख होतें, त्याची सर कशास येणार आहे? यःकश्चित् मुंग्यासुद्धां आपलीं अंडीं जपून तोंडांत धरून न फोडतां दूर नेत असतात; तर तुमच्यासारख्यांनीं आपल्या धर्मपत्नीचा व पुत्राचा त्याग करावा काय? तुम्ही मृगया करतां करतां कण्वाश्रमांत आलां होतां; व मजशीं गांधर्वविधीनें विवाह केला होता. तेथून तीन वर्षें गर्भ धारण केल्यानंतर हा पुत्र मला झाला. हा कुमार चक्रवर्ती होऊन शंभर अश्वमेध करील, अशी याचे जन्माचे वेळीं आकाशवाणी झाली आहे. तुमच्या देहाची दुसरी लहानशी प्रतिमा असलेला असा हा पुत्र तुमचेकडे उत्कंठेनें आला असून, तुम्हांकडे

मोठ्या आशेनें वांकड्या नजरेनें पाहत आहे. याचा त्याग तुम्हीं करूं नका. विश्वामित्रापासून मेनकेचे पोटीं हिमालयाचे पठारावर मीं जन्मलें. पण ती निष्ठुर स्त्री जणूं काय दुसऱ्याचीच मुलगी असल्यासारखी मला तेथेंच टाकून चालती झाली. पूर्व जन्मीं मीं असें कोणतें पातक केलें होतें कीं, लहानपणीं आईबापांनीं मला टाकली व आतां तारुण्यांत तुम्हीं माझा त्याग करीत आहां! माझा त्याग करावयाचाच असेल तर करा; मी कण्वाश्रमास परत जाईन. पण या तुमच्या—व माझ्या—बाळाचा मात्र त्याग नकाहो करूं!"

शकुंतलेचें हें दीनवाणें व दगडासही पाझर फोडणारें भाषण ऐकूनही दुष्यंतानें आपला कठोरपणा सोडला नाहीं. तो म्हणालाः-- 'तुझ्या पोटीं झालेला हा पुत्र माझा, असें मी मुळींच ओळखीत नाहीं. बायका फार लबाड असतात; तुझ्या बोलण्यावर कोणाचा विश्वास बसेल? तुला हिमालयावर टाकून देणारी तुझी आई मेनका निर्दय व वेश्या होती. तुझा बाप विश्वामित्र क्षत्रिय असूनही त्यास ब्राह्मणत्वाचा लोभ सुटला होता, व तोही तिच्या इतकाच कामातुर व निष्ठुर होता. तथापि तुझ्या म्हणण्याप्रमाणें मेनका ही श्रेष्ठ अप्सरा व विश्वामित्र हा महान् ऋषि असला, तरी त्यांची मुलगी म्हणविणारी तूं व्यभिचारिणीसारखें माझेसमोर बोलत आहेस; तुला लाज कशी नाहीं वाटत? अगे दुष्ट तापसी! तुझ्या बोलण्यावर माझा मुळींच विश्वास बसत नाहीं; तूं मुकाट्यानें चालती हो. मेनका अप्सरा कोणीकडे, विश्वामित्र कोणीकडे, आणि तूं त्यांची तापसी वेषानें मजकडे आलेली मुलगी कोणीकडे? हा तुझा मुलगा तूं सांगितलेल्या ६ वर्षांचे वयाचे

मानानें फारच मोठा व सशक्त दिसत आहे; सहा वर्षांत हा इतका कसा गे वाढला ? *मदनपीडित मेनकेपासून तूं यदृच्छेनें उत्पन्न झालेली असून हलक्या कुलाची आहेस; व म्हणूनच जारिणीसारखें* असलें वाईट भाषण करीत आहेस. तूं सांगत आहेस त्या गोष्टी मला मुळींच माहीत नाहींत; व मी तुलाही ओळखत नाहीं. वाट फुटेल तिकडे तूं चालती हो ! ”

राजाचें हें अत्यंत कठोर भाषण ऐकून शकुंतलेनें उत्तर केलें:— “ राजा, दुसऱ्याचे डोळ्यांतलें कुसळ तुला दिसतें, पण स्वतःच्या डोळ्यांतलें मुसळही दिसत नाहीं ! माझ्या कुलाची तूं निंदा-कर; पण तुझ्यापेक्षां माझें कुल श्रेष्ठ आहे. माझी माता मेनका ही देवांतील अप्सरा आहे. तूं नुसता या मृत्युलोकावरचा पामर आहेस; पण सर्वलोकीं व अंतरिक्षांतही मला संचार करतां येतो. आरशांत मुख पाहीपर्यंतच कुरुप्यास आपण सर्वांगसुंदर आहों, असें वाटत असतें; व स्वतः दुर्जन असलेलाच पुरुष सज्जनास ‘ दुर्जन ’ म्हणत असतो; तुझीही स्थिति अशीच झाली आहे. कुल व वंश यांचा आधारस्तंभ असलेल्या व पितरांची नरकापासून मुक्तता करणाऱ्या अशा पुत्राचा त्याग करणाराचे वैभवाचा देव नाश करतात. तुझ्या ह्या वर्तनानें धर्म व सत्य या दोहोंचीही हानि होत आहे !

**वरं क्रतुशतात्पुत्रः सत्यं पुत्रशताद्वरम् ।**

**शंभर यज्ञांहून पुत्राची योग्यता अधिक आहे. पण पुत्रा-हूनही सत्याची थोरवी जास्त आहे.**

सर्ववेदाधिगमनं सर्वतीर्थावगाहनं ।
सत्यं च वचनं राजन्समं वा स्यान्न वासमम् ॥
नास्ति सत्यसमो धर्मो न सत्याद्विद्यते परम् ।
न हि तीव्रतरं किंचिदनृतादिह विद्यते ॥

**सर्व वेदांचें अध्ययन किंवा सर्व तीर्थांचें स्नान यांस तरी सत्याची सर येईल कीं नाहीं याची वानवाच आहे. सत्यासारखा दुसरा धर्म नाहीं व सत्याहून कांहींही श्रेष्ठ नाहीं. तसेंच असत्याहून अधिक तीव्र असें दुसरें कोणतेंही पातक नाहीं.** यासाठीं आपलें वचन मोडून सत्यभ्रष्ट होऊं नका. इतकें मीं सांगत असूनही माझें बोलणें जर तुम्हांस खरें वाटत नसेल, किंवा असत्याचरणच तुम्हांस करावयाचें असेल, तर तुम्हांजवळ राहण्याची माझीही इच्छा नाहीं ! हिमालयरूपी शुभ्र तुराच जिनें मस्तकीं धारण केला आहे, अशा या समुद्रवलयांकित भूमीचें राज्य तुमच्या साहाय्याशिवायच माझा हा पुत्र संपादन करील."

याप्रमाणें बोलून शकुंतला निघून जाऊं लागली. इतक्यांत, " शकुंतला सांगत आहे तें सर्व खरें आहे; हा तुझाच पुत्र आहे. याचें भरण ( पालनपोषण ) तूं कर; आमच्या सांगण्यावरून तूं याचें ' भरण ' केलेंस म्हणजे मग त्याचें नांव '**भरत** ' असें ठेव." अशी आकाशवाणी झाली. ती ऐकून दुष्यंत राज-सभेंतील आचार्य, पुरोहित व मंत्री यांस आनंदानें म्हणालाः—' ही आकाशवाणी ऐका; हा माझाच पुत्र आहे हें मीं जाणतच होतों. पण मीं जर त्याचा व हिचा केवळ हिच्या म्हणण्यावरूनच एकदम स्वीकार केला असता, तर लोकांस माझ्याविषयीं संशय येऊन या दोघांच्या शुद्धतेविषयींही त्यांस शंका आली असती ' असें बोलून

दुष्यंतानें भरतास प्रेमानें आलिंगून आपल्याजवळ बसवून घेतलें. सर्व सभासदांसही आनंद व हर्ष झाला. राजा शकुंतलेचें प्रेमानें सांत्वन करीत म्हणाला:—" देवी! तुझा माझा घडलेला संबंध जरी धर्म्य तरी गुप्त होता. हा संबंध लोकांच्या परीक्षेच्या भट्टींतून तावून सुलाखून घेणें मला भाग पडलें; व त्यामुळेंच मीं असें निष्ठुर आचरण केलें. मी तुम्हां दोघांचा एकदम स्वीकार केला असता तर तूं केवळ स्त्रीस्वभाव म्हणून व कामप्रेरित होऊन माझ्याशीं संगम केलास, आणि मींही राज्यावर कोणीतरी कसला तरी वारस हवा म्हणून पुत्राचा स्वीकार केला, असें प्रजाजनांस वाटलें असतें. हा अपवाद टळावा म्हणून मी तुला भलभलतें बोललों; तें ऐकून त्या वेळीं तूं संतापानें जें जें मला बोललीस त्याची मी तुला क्षमा करतों."*

---

* कालिदासाच्या सुप्रसिद्ध 'अभिज्ञान शाकुंतल' नाटकांत ही कथा कांहीं अंशीं निराळी दिली आहे. तींत शकुंतला हस्तिनापुरास ६।७ वर्षांनीं जात नसून गर्भवती असतांनाच गेली आहे. तिचा भरराजसभेंत दुष्यंतानें अपमान केला, त्या वेळीं कण्वशिष्य तेथेंच आहेत. महाभारतांतील कथेप्रमाणें, दुष्यंत विशिष्ट हेतूनें शकुंतलेशीं केलेल्या विवाहाचें स्मरण नसल्याचें ढोंग करीत नसून दुर्वासानें शकुंतलेस दिलेल्या शापामुळें त्यास विस्मृति झालेली आहे. कण्वाश्रमांतून परत जातांना दुष्यंतानें शकुंतलेस गांधर्वविवाहाची खूण म्हणून स्वतःचें नांव कोरलेली अंगठी दिली होती, व ती हातांत घालूनच ती राजधानीस जात होती. पण दुष्यंतास ती अंगठी काढून दाखविण्यासाठीं बोट चाचपते, तों तेथें अंगठी नाहीं असें दिसून येतांच शकुंतला गोंधळून गेली व 'बायका लबाड असतात' असें दुष्यंतास म्हणतां आलें. ही अंगठी शकुंतलेला न कळत तिच्या बोटांतून वाटेंतील शचि-तीर्थांत पडली होती. राजानें त्याग केल्यानंतर शकुंतला अप्सरस्तीर्थाजवळ जाऊन अत्यंत शोक करूं लागली असतां

[पुढें चालू]

पुढें दुष्यंतानें पुत्राचें नांव ' भरत ' ठेवून त्यास युवराजाचा अभिषेक केला. त्यानें आपल्या पराक्रमानें सर्व राजे जिंकले; व अनेक यज्ञ केले. ' भरतखंडाचा चक्रवर्ती व सार्वभौम राजा ' अशी त्याची कीर्ति सर्वत्र दुमदुमूं लागली. कण्वऋषीनीं त्याजकडून ' गोवितत ' नांवाचा अश्वमेध यज्ञही करविला. हा यज्ञ समाप्त झाल्यानंतर भरतानें त्यांस एक हजार पद्म दक्षिणा दिली ! याच भरताचे नांवावरून त्याचे कुलास व पुढील वंशजांस ' भारत ' अशी संज्ञा प्राप्त झाली. ( आदि० अ० ७४ )

---

[ मागील पृष्ठावरून ]
मेनका अप्सरेनें तिला उचलून नेऊन मारीच ऋषींचे आश्रमांत ठेवलें. इकडे तीर्थांत पडलेली अंगठी ज्या माशानें गिळली, तो मासा एका धीवरानें धरून मारला, तेव्हां त्याचे पोटांतील अंगठी त्यास दिसली. ती राजनामांकित अंगठी हस्तिनापुराचे बाजारांत तो विकीत असतां, राजदूतानें त्यास पकडून दुष्यंताकडे नेलें. अंगठी दृष्टीस पडतांच राजास शकुंतलेशीं केलेल्या विवाहाचें स्मरण होऊन तो अतिशय शोक करूं लागला. पुढें बरेच दिवसांनीं राक्षससंहाराचे कार्यांत इंद्रास साहाय्य करून दुष्यंत परत येत असतां, वाटेंत मारीचाश्रमांत शकुंतलेच्या पुत्र पाहून, त्यास न ओळखतांही दुष्यंताचे मनांत एकदम विलक्षण वात्सल्य उत्पन्न झालें; आणि पुढें शकुंतलेची व पुत्राचीही ओळख पटून उभयतांच्या विरहाचा व दुःखाचा गोड शेवट झाला; अशी शाकुंतल नाटकांतील कथा आहे.

# दमयंती-चरित्र.

निषध देशांत वीरसेनपुत्र नलनामक राजा राज्य करीत असे. तो मोठा उदार, बलिष्ठ, शूर व पराक्रमी असून तेज, सौंदर्य, विद्वत्ता व सत्यनिष्ठा इत्यादि गुणांनीं सर्वांस प्रिय झाला होता. अश्वविद्येंत तो विशेष प्रवीण असून द्यूताचीही त्यास फार आवड होती. याच वेळीं विदर्भ देशांत भीम नांवाचा शूर व पराक्रमी राजा राज्य करीत होता. त्यास संतति नसल्यामुळें, दमननामक ब्रह्मर्षींची त्यानें पत्नीसह एकनिष्ठेनें व पूज्यबुद्धीनें सेवा केली. तेव्हां त्याचे कृपाप्रसादानें त्यास तीन पुत्र व एक कन्या झाली. त्यांचीं दम, दांत, दमन व दमयंती अशीं नांवें ठेवलीं होतीं. दमयंती भर तारुण्यांत आली तेव्हां रूप, तेज, कांति, सुकुमारता इत्यादि गुणांमुळें ' उत्कृष्ट स्त्रीरत्न ' म्हणून तिची दिगंत कीर्ति झाली. शंभर सख्या व शंभर दासी यांसह जेव्हां ती प्रमदावनांत क्रीडा करी तेव्हां आपल्या अप्रतिम तेजानें व अनुपमेय लावण्यानें सर्वांचे डोळे दिपवीत असे. नलराजाचें रूपही प्रत्यक्ष अश्विनीकुमार किंवा मदन यांजसारखें असल्याची चोहोंकडे प्रख्याति झाली होती. नलासमोर दमयंतीची व दमयंतीपाशीं नलाची स्तुति लोक वारंवार कौतुकानें व गुणग्राहकतेनें करीत असत. यामुळें एकमेकांनीं एकमेकांस जरी पाहिलें नव्हतें, तरी उभयतांचे मनांत एकमेकांविषयीं उत्कट प्रेम हळुहळु उत्पन्न होऊं लागलें. हें

प्रेम जसजसें वाढत चाललें तसतसें त्या दोघांसही चैन पडेनासें झालें. अशा स्थितींत नलराजा एके दिवशीं अंत:पुराजवळच्या उपवनांत मन रंजाविण्यासाठीं हिंडत असतां, सुवर्णतुल्य अंगकांति असलेल्या हंसांचा एक थवा त्याचे दृष्टीस पडला. त्यांपैकीं एक पक्षी पकडून नलानें हातीं धरला असतां, तो हंस त्यास म्हणाला:— " राजा, मी तुझें प्रिय करीन; मला मारूं नको. दमयंतीपाशीं मी तुझी अशी स्तुति करीन कीं, तुजवांचून अन्य पुरुषाचा विचारही तिचे मनांत येणार नाहीं. " हंसाचें हें भाषण ऐकून राजानें त्यास सोडून दिलें. नंतर हंसांचा हा कळप तेथून उडून, विदर्भनगरींत राजवाड्याजवळच्या प्रमदावनांत सख्या व दासी यांसह दमयंती जेथें क्रीडा करीत होती, तेथें उतरला. सुवर्ण-शरीराचे हे अपूर्व हंस पाहून त्यांस धरण्याचा प्रयत्न त्या स्त्रिया करूं लागल्या; व नलास भेटलेल्या हंसाचे पाठीमागें दमयंती जाऊं लागली. तिला बरीच दूर नेऊन मग त्या हंसानें मनुष्यवाणीनें तिजशीं बोलण्यास सुरुवात केली. तो म्हणाला:—" नलराजा रूपानें मूर्तिमंत मदनच आहे. मी देव, गंधर्व, मनुष्यें, राक्षस वगैरेंचे अनेक देश पाहिले आहेत; परंतु त्याचे सारखा सुंदर व गुणी पुरुष आम्हांस कोठेंच दिसला नाहीं. नल हा पुरुषांत श्रेष्ठ असून तूंही स्त्री-रत्न आहेस. तुमचा उभयतांचा जर अपूर्व संगम होईल तर तुझें जन्म व रूप हीं दोनही सफळ होतील. " हें भाषण ऐकून दमयंती फारच लाजली; तरी तिनें ( त्वमप्येवं नलं वद ) ' असेंच तूं नलासही सांग ' एवढेंच त्यास म्हटलें. नंतर त्या हंसानें तेथून पुन: निषध देशास येऊन नलराजास हें सर्व भाषण व दमयंतीचा प्रेमाचा निरोप विदित केला. ( वन० अ० ५३ )

प्रमदावनांत हंसाचें भाषण ऐकिल्यापासून दमयंतीची चित्तवृत्ति फार अस्थिर झाली. ती कृश, निस्तेज, दीन व चिंतातुर दिसूं लागली. आकाशाकडे शून्य दृष्टि लावून तिनें वेड्यासारखें कोणाचें तरी एकाग्रपणें ध्यान करीत असल्याप्रमाणें उसासे टाकीत बसावें; व क्षणांत भानावर येऊन तिचें तोंड एकदम उतरावें. नलासाठीं उसासे टाकण्यांत व रडण्यांत दंग झाल्यामुळें रात्रंदिवस तिला झोंप येईनाशी होऊन राजवाड्यांतील राजविलासांचा तिला वींट आला. दमयंतीच्या ह्या अवस्थेचें वर्तमान तिच्या सख्यांनीं भीमराजास निवेदन केलें; तेव्हां त्यानें तिचें स्वयंवर करण्याचा निश्चय करून सर्व देशांच्या राजांस व राजपुत्रांस निमंत्रणें पाठविलीं. दमयंतीच्या रूपगुणांची कीर्ति चोहोंकडे आधींच पसरली असल्यामुळें अनेक राजे व राजपुत्र आपापल्या इतमामासह विदर्भनगरीनजीक येऊन उतरले; व स्वयंवराची मोठ्या उत्सुकतेनें वाट पाहत राहिले. **जे धर्मज्ञ क्षत्रिय प्राणांचीही परवा न करतां व मागें न हटतां युद्धांत शस्त्रानें मरण येऊन रणांत पडतात, त्यांस अक्षय्य स्वर्गसुख मिळत असतें.** या न्यायानें स्वर्गांत अनेक क्षत्रिय यावयाचे ते येणें कां बंद झालें, असा प्रश्न इंद्रानें नारद व पर्वत या ऋषींस केला. तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, ‘दमयंतीच्या स्वयंवरासाठीं सर्व राजे व राजपुत्र विदर्भदेशांत गेले असल्यामुळें युद्धें बंद पडलीं आहेत.’ दमयंतीच्या लावण्याची नारदांचे तोंडून प्रशंसा ऐकून खुद्द इंद्र, अग्नि, वरुण व यम ह्या लोकपालांनींही दमयंतीच्या स्वयंवरास जाण्याचा निश्चय केला व त्याप्रमाणें ते आपापल्या विमानांत बसून विदर्भ देशच्या राजधानीकडे आले. त्याचवेळीं नलराजाही रथांत बसून स्वयंवरासाठीं येत होता. त्याचें

तें अद्वितीय रूप व तेज पाहून त्या देवांस परम विस्मय वाटून इष्टकार्यसिद्धि होण्याची त्यांची आशाही नष्ट होऊं लागली. तथापि विमानें आकाशांतच थांबवून ते लोकपाल खालीं आले व नलास म्हणाले:—"नलराजा, तूं मोठा सत्यव्रती आहेस; आमचा दूत होऊन तूं आम्हांस थोडेसें साहाय्य कर." ( अध्याय ५४ ) हें भाषण ऐकून, देवांचा काय अंतस्थ हेतु आहे हें न कळल्यामुळें नलानें त्यांचा दूत होण्याचें कबूल केलें; आणि मग 'आपण कोण? आपलीं नांवें काय? व आपलें कोणतें कार्य मीं करावयाचें?' असें त्यानें त्यांस विचारलें. तेव्हां इंद्रानें आपलें व इतर देवांचीं नांवें सांगून त्यास उत्तर दिलें:—"आम्ही दमयंतीप्राप्त्यर्थ इकडे आलों आहों. हें आमचें मनोगत आमचा दूत या नात्यानें दमयंतीकडे जाऊन तूं तिला कळीव, व आम्हांपैकीं कोणा एका लोकपालास वरण्याबद्दल तिचें मन वळीव." देवांनीं आपणास अशा रीतीनें पेचांत धरल्याचें लक्षांत येतांच नलास फार वाईट वाटलें. तो त्यांस नम्रपणें म्हणाला:—"मीही त्याच उद्देशानें इकडे आलों असल्यामुळें मला तुम्ही हें काम कृपा करून सांगूं नका. ज्या स्त्रीवर एकाद्याचें मन जडलें आहे, तो पुरुष त्या स्त्रीला दुसऱ्यास वरण्यास कसें सांगेल?" तेव्हां इंद्र म्हणला:— 'दूत होऊन तुम्हांस साहाय्य करतों, असें वचन एकदां देऊन आतां तूं माघार कसा घेतोस व वचनभंगाचें पातक कसें करतोस?' नल:—'भीमराजाचा राजवाडा व अंतःपुर यांजवर सक्त पाहारा असल्यामुळें मला तेथें गुप्तपणें कसें जातां येईल?' इंद्रः—'त्याची काळजी तुला नको; आमचे प्रसादानें तुला तेथें गुप्तपणें कोणास न दिसतां जातां येईल.' याप्रमाणें



दमयंती व नल यांस परस्परांची मनोमय ओळख पटली. पृष्ठ २३.

बोलणें झाल्यावर नलाचा निरुपाय झाला; व केवळ वचनभंगाचें पाप लागूं नये व देवांचा रोष होऊं नये म्हणून तो हें अत्यंत दुर्घट व दुःखदायक कार्य करण्यासाठीं नगरांत गेला. देवांनीं वर दिल्यामुळें त्याचा गुप्तपणें अंतःपुरांत प्रवेश झाला. तेथें सख्या व दासी यांचेमध्यें बसलेली दमयंती त्याचे प्रत्यक्ष दृष्टीस पडली. लावण्य व तेज यांनीं दैदीप्यमान व अत्यंत सुकुमार अशी दमयंती चंद्राप्रमाणें आपले भोंवतीं प्रकाशच पाडीत आहे कीं काय, असा त्यास भास झाला. नलाचेंही रूप व तेज पाहून दमयंतीच्या सख्या व दासी लाजून व भिऊन गडबडीनें उठून उभ्या राहिल्या व त्याजकडे टकमकां पाहूं लागल्या. 'हा कोणी देव आहे कीं यक्ष आहे किंवा गंधर्व आहे' याप्रमाणें मनांत आश्चर्य करीत त्याशीं कांहीं न बोलतां त्या सर्वजणी तटस्थ झाल्या. किंबहुना त्याचें तेज पाहून व लाजल्यामुळें त्यांचे तोंडून शब्दच निघेना! दमयंती व नल यांनीं एकमेकांस पाहतांच त्यांस परस्परांची मनोमय ओळख पटली. कांहीं वेळानें दमयंतीच किंचित् स्मित करून पण विनयानें त्यास म्हणालीः—" आपण देवासारखे दिसणारे वीर पुरुष येथें कोणत्या हेतूनें आलां आहांत? आपलें नांव काय? राजाची शिस्त मोठी कडक असून व राजवाड्यावर आणि अंतःपुरावर सक्त पाहरे असून आपण कोणास न कळतां येथ कसे आलांत?"

नलः—" मी नलराजा असून इंद्र, अग्नि, वरुण व यम या देवांचा व लोकपालांचा दूत म्हणून तुजकडे आलों आहें. त्या देवांचें मन तुजवर बसलें आहे; तर त्यांपैकीं कोणा एकास तूं वर. त्यांच्याच प्रभावामुळें कोणास न दिसतां मला येथें येतां आलें. हा

निरोप तुला कळविण्यासाठींच देवांनीं मला पाठविलें आहे. तो ऐकून तुझी जशी इच्छा असेल तसें कर." ( अ० ५५ ) नलाचें हें भाषण ऐकून दमयंतीनें देवांस नमस्कार केला; व हंसत हंसत ती नलास म्हणाली:—"माझाही स्वतःचा देह व माझें सर्वस्व आपलेंच आहे, आपण मला वाटेल ती आज्ञा करा. पण हंसाचें भाषण ऐकल्यापासून माझें शरीर सारखें जळत आहे. आपणां-करतांच पित्याकडून स्वयंवर समारंभ करवून मीं सर्व राजे येथें आणविले आहेत. **आपणास अनन्यभावें भजणाऱ्या माझा जर आपण त्याग कराल तर मग आपणांकरतां मला विष, अग्नि, जल अथवा गळफांस यांचा आश्रय करावा लागेल."** नलः—"दैत्य-दानवांचा संहारकर्ता व देवांचा राजा इंद्र, सर्व जग जाळून टाकणारा अग्नि, ज्याच्या भयानें सर्व प्राणी-मात्र धर्मानें चालत आहेत तो यम किंवा वरुण हे देव-लोकपाल तुझी इच्छा करीत असतां त्यांच्या पायांच्या धुळीचीही ज्यास सर येणार नाहीं, अशा मृत्युलोकींच्या मनुष्याची—माझी—पत्नी होण्याची तूं कां इच्छा करीत आहेस? या देवांस अप्रिय असें जर आपण माणसांनीं वर्तन केलें, तर आपला नाश होईल. याकरतां यांपैकीं एकाद्यास वरून तूं माझें संरक्षण कर." नलाचें हें भाषण ऐकून दमयंती अश्रु ढाळीत व स्फुंदत हात जोडून व कांपत कांपत नलास म्हणाली:—'नाहीं नाहीं. सर्व देवांना नमस्कार करून मी आपणांसच वरणार, हें मी आपणांस शपथपूर्वक सत्य म्हणून सांगतें.' नलः—'एकदां दुसऱ्यास—विशेषतः देवांस—वचन देऊन व त्यांचा दूत होऊन त्यांचें कार्य करण्यासाठीं मीं येथें आलों असतां मी आपलाच स्वार्थ साधण्याचा यत्न करणें निंद्य

आहे. देवांचा दूत या नात्याचें माझें जें कर्तव्य त्यास विरोध न येतां जर माझें इष्ट साधत असेल तरच तें मला हवें आहे. दूतधर्म व माझा स्वार्थ हीं दोनही साधतील असा एकादा उपाय तूं शोधून काढ." हें ऐकून कांहीं वेळ विचार करून अश्रु गाळीत दमयंती त्यास हळुच म्हणाली:—" आपणांस दोष न लागतां आपले मनोरथ पूर्ण होतील असा उपाय मला सुचला आहे. आपणासह देवांनीं स्वयंवरास यावें; म्हणजे तेथें त्या लोकपालांचे समक्षच मी आपणांस वरतें, म्हणजे आपणांकडे कांहीं दोष येणार नाहीं." हा उपाय नलास पसंत पडला. नलानें परत देवांकडे येऊन अंत:पुरांत घडलेलें सर्व वर्तमान सविस्तर व जसें घडलें होतें तसें त्यांस निवेदन केलें. ( अ० ५६ )

नंतर एका मंगल दिवशीं शुभ मुहूर्तावर भीमराजानें स्वयंवर-समारंभ केला. स्वयंवरासाठीं सोन्याच्या खांबांची व तोरणांनीं सजविलेली रंगसभा तयार केली होती. तेथें सर्व राजे व राजपुत्र बहुमोल वस्त्रें व भूषणें धारण करून जमले. रंगमंडपांत प्रवेश करतांच दमयंतीनें आपल्या लावण्यानें व तेजानें सर्वांचे नेत्र व मनें आपणाकडे एकदम इतकीं आकर्षून घेतलीं कीं, राजांची दृष्टि जी एकदां तिजकडे वेधली ती पुन: तेथून ढळलीच नाहीं! जमलेल्या राजांचीं नांवें, कुळें व देश यांचा उच्चार होत असतां रंगसभेमध्यें एक सारख्या रूपाचे पांच नलराजे बसलेले दमयंतीच्या दृष्टीस पडले; तेव्हां देवांचें हें कपट तिचे लक्षांत आलें. वृद्धांकडून देवांचीं जीं विशिष्ट लक्षणें तिनें ऐकलीं होतीं, तीं कोणामध्यें आहेत हें ती पाहूं लागली. परंतु देव कोण व खरा नल कोण यांचा तिला उमज पडेना. तेव्हां त्या लोकपाल देवांस वाणीनें व मनानें नम-

स्कार करून व नम्रपणें हात जोडून कांपत कांपत दमयंती म्हणाली:-"हंसाचें भाषण ऐकल्यापासूनच जर मीं नलराजास पति म्हणून मनानें वरलें असेल, तेव्हांपासून मनानें किंवा वाणीनें जर मी अन्यपुरुषसंसर्ग केला नसेल, देवांनींच जर निषधराजा हा माझा पति म्हणून नेमून ठेवलेला असेल, आजपर्यंत नलाच्या मनोमय आराधनेचें व्रत जर मीं अखंड पाळलें असेल, तर देवांनीं या वेळीं आपापलें स्वरूप प्रगट करून पुण्यश्लोक नळराजा कोणता तो मला दाखवावा." **दमयंतीचें हें शुद्ध मन, बुद्धिमत्ता, तिचा निर्धार, नलावरचें तिचें खरें प्रेम व अपूर्व निष्ठा हीं पाहून** व तिचें वरील करुण वाणीचें भाषण ऐकून **देवांनीं आपला विरोध सोडून दिला** व आपापलीं विशिष्ट लक्षणें धारण केलीं. देवांचे नेत्रांचीं पातीं लवत नसून त्यांस घाम नव्हता, त्यांचे हार ताजे-तवाने असून त्यांचे अंगावर धूळही नव्हती, ते भूमीस स्पर्श न करतां अधांतरीं बसलेले होते, व त्यांच्या शरीराची छायाही पडली नव्हती. या लक्षणांवरून देव कोणते व नलराजा कोणता हें दम-यंतीनें ओळखलें. मग तिनें नलजवळ जाऊन लाजत लाजत त्याच्या वस्त्राच्या पदराचें टोंक हातांत धरलें व त्याचे गळ्यांत माळ घातली; तेव्हां सर्व सभेंत सानंद आश्चर्योद्गार निघाले. नंतर नल आपल्या पत्नीस सांत्वनपूर्वक म्हणाला:—" देवांचा त्याग करून त्यांचेसमक्ष ज्या अर्थीं तूं मला वरिलें आहेस त्या अर्थीं या देहांत पंच प्राण आहेत तोंपर्यंत माझे अंत:करणांत तुजबद्दल प्रेम राहील." असें म्हटल्यावर नल-दमयंती हीं दोघेंही मनानें लोकपाल देवांस शरण गेलीं. तेव्हां त्यांनीं नलास आठ वर दिले. नलास यज्ञांत अग्नीचें प्रत्यक्ष दर्शन होऊन त्यास उत्तम गति प्राप्त

होईल. व इच्छा होईल तेथें अग्नि प्रगट होईल व त्याचें तेजही त्यास प्राप्त होईल. नलाला पाकसिद्धि उत्तम प्राप्त होईल व त्याची धर्मनिष्ठा दृढ राहील, नलराजा इच्छील तेथें उदक प्राप्त होईल. याप्रमाणें अनुक्रमें वर देऊन व त्या उभयतांस उत्तम सुगंधि पुष्पमाला देऊन चारही देव स्वर्गीं गेले. राजेही आपापल्या देशांस निघून गेल्यावर भीमानें नल-दमयंतींचा यथाविधि विवाह केला. विदर्भ देशांत बरेच दिवस राहून श्वशुर-गृहांतील आदरातिथ्याचा स्वीकार केल्यानंतर नळराजा दमयंतीसह आपल्या राजधानीस परत आला; आणि तिजसह आनंदानें व सुखानें कालक्रमणा करूं लागला. त्यानें अश्वमेध व इतर अनेक यज्ञ-याग केले. कांहीं वर्षांनीं त्यास दमयंतीचे पोटीं इंद्रसेन हा पुत्र व इंद्र-सेना ही कन्या झाली. ( अध्याय ५७ )

इकडे स्वयंवर होऊन लोकपाल स्वर्गाकडे परत जात असतां वाटेंत त्यांस कलि व द्वापर भेटले. कलीचेंही मन दमयंतीवर बसलें असून तो स्वयंवरास येत होता; परंतु स्वयंवर होऊन गेलें असून लोकपालांस सोडून दमयंतीनें नळासच वरिल्याची वार्ता कलीस त्यांजकडून कळली. तेव्हां तो अत्यंत खजिल झाला व त्यास क्रोधही आला. यःकश्चित् मनुष्यास वरून देवांचा उपमर्द करणाऱ्या दमयंतीस व तिच्या पतीस चांगलेंच शासन केलें पाहिजे, असें कलीनें उघड बोलून दाखविलें; तेव्हां इंद्र म्हणालाः—“ दमयंतीनें आम्हांसमक्ष व आमचे संमतीनेंच नलास वरिलें आहे. **वेदधर्मवेत्ता, सदाचारी, दयाळु, सत्यवादी, धैर्यवान् व सुस्वरूप किंबहुना सर्वगुणसंपन्न असा राजा आम्ही लोक-पालांहून बिलकुल कमी योग्यतेचा नाहीं.** अर्थात् अशा नल

राजास दमयंतीनें वरिलें यांत वावगें तें काय झालें ? अशा पतिपत्नींस जो शाप देईल तो अक्षय्य रौरव नरकांत पडेल.' याप्रमाणें बोलून देव स्वस्थानीं गेले; तरी कलीचा राग शांत झाला नाहीं. उभयतांनीं आपसांत मसलत करून नलास राज्यभ्रष्ट करण्याचा आणि त्याची दमयंतीपासून ताटातूट करण्याचा निश्चय केला. ( अध्याय ५८ ) व दोघे कलि-द्वापार निषधराजधानींत येऊन राहिले. याप्रमाणें बारा वर्षें लोटलीं तरी नलाचे शरीरांत प्रवेश करण्याची कलीस संधि मिळाली नाहीं. अखेर एके दिवशीं नलराजानें मूत्रोत्सर्ग केल्यावर चुकून पाय न धुतां नुसत्या चुळाच भरून टाकून संध्यावंदन केलें. ह्या अमंगल व अपवित्र आचाराचे वेळीं कलीच्या प्रवेशास चांगलीच संधि मिळाली. कलीनें नलामध्यें प्रवेश केला; व त्याचा भाऊ पुष्कर याजकडे जाऊन त्यासही प्रोत्साहन दिलें कीं, नलाशीं द्यूत खेळलें असतां तुला या वेळीं पूर्ण यश येऊन निषध देशचें राज्यही तुला लाभेल. या प्रोत्साहनास अनुसरून पुष्कर द्यूत खेळण्यासाठीं नलाकडे निघाला. कलीनें वृषभाचें रूप धारण केलें व द्वापर फांशांत प्रवेश करून राहिला. पुष्करानें नळाकडे येऊन दमयंतीसमक्ष, 'हा बैल पणास लावून द्यूत खेळूं या' असें त्यास वारंवार आव्हान केलें. पुष्कराचें आव्हान वरचेवर नाकारणें नलास अपमानकारक वाटून त्यानें त्याशीं अखेर द्यूत खेळण्यास आरंभ केला. खेळाचे आरंभापासून पुष्करास हवें तें दान फांसे देत; व नको तें दान नळास पडे ! याप्रमाणें नळराजा दुर्दैवाच्या व कलीच्या फेऱ्यांत सांपडून रत्नें, भूषणें, घोडे, हत्ती, रथ, वस्त्रें भराभर पणास लावून हारवूं लागला ! द्यूतांत जसजसें त्यास अपेश येत

चाललें तसतशी त्याची द्यूताची ईर्षा वाढूंच लागली ! नळराजाची ही स्थिति पाहून त्याचें या संकटापासून व व्यसनापासून निवारण करण्याच्या उद्देशानें अनेक पौरजनांनीं व मंत्र्यांनीं त्याची भेट घेण्याचा प्रयत्न केला. दमयंतीनेंही नळाजवळ जाऊन पौर व मंत्री राजनिष्ठापूर्वक भेटीसाठीं आल्याचें त्यास वरचेवर कळविलें. पण द्यूताचा मद व कलीचा प्रभाव यांमुळें तो त्या भाषणाकडे लक्षसुद्धां देईना. नळराजा शुद्धीवर नाहीं असें पाहून पौरजन व मंत्री दुःखित व लज्जित होऊन घरीं जात. याप्रमाणें नळ व पुष्कर यांचें बरेच महिने द्यूत झालें; तरी त्यांत नळास एकही डाव जिंकतां आला नाहीं. ( वन० अ० ५९ )

नळराजाला याप्रमाणें द्यूताचें पक्कें वेड लागल्याचें पाहून साध्वी दमयंतीला अत्यंत दुःख झालें व भयही वाटलें. तिनें बृहत्सेना नांवाच्या विश्वासुक दाईचे हातीं नळाची आज्ञा म्हणून अमात्यास असें सांगून पाठविलें कीं, नळाचें द्रव्य पुष्करानें हरण किती केलें आहे व शिल्लक किती राहिलें आहे, याची गणना करावी. भानावर येऊन नळ द्रव्याची मोजदाद करावयास सांगत आहे, तेव्हां कदाचित् तो आतां द्यूत बंद करील, असें अमात्यांस वाटून मोठ्या आनंदानें ते नळाकडे आले. दमयंतीनेंही पुनः ते आल्याचें वर्तमान त्यास कळविलें, तरीही पूर्ववत् त्यानें तिच्या बोलण्याकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं ! याप्रमाणें दोन वेळां अनुभव आल्यामुळें दमयंतीची निराशा झाली. तिनें पुनः बराच विचार करून त्या दाईकडून वार्ष्णेयनामक नळाच्या विश्वासू सारथ्यास बोलावून आणलें. तो आल्यावर त्यास दमयंती म्हणाली:—“ राजाचा तुजवर लोभ किती आहे, हें तुला माहीत आहेच. सांप्रत महाराज पुष्कराशीं

द्यूत खेळण्यांत गुंगले असून ते मित्रांचें, आप्तांचें किंवा माझेंही बोलणें ऐकेनासे झाले आहेत. डावांत जसजसे ते हरत आहेत तसतसा द्यूताचा त्यांचा मोह वाढतच आहे! **यांत त्यांच्याकडे कांहीं दोष नाहीं; त्यांना कोणीं तरी मोह घातल्यामुळेंच ते असे वागत आहेत.** सांप्रत त्यांजवर व आम्हांवर आलेल्या या संकटांतून आमची मुक्तता कर. महाराजांचे आवडते घोडे जोडून त्यांचा रथ तयार कर. व त्यांत हीं माझीं दोनही लेंकरें घालून माझ्या माहेरीं जा; व त्यांस माझ्या माहेरच्या माणसांचे हवालीं करून घोडे व रथ तेथेंच ठेव. तूंही तेथेंच रहा; वाटेल तर दुसरीकडे इच्छा असेल तिकडे जा!" दमयंतीचें हें बोलणें वार्ष्णेय सारथ्यानें नलाचे अमात्यांस कळविलें; त्यांस तिची ही सावधगिरीची युक्ति पसंत पडून त्यांनीं त्या सारथ्यास तसें करण्याची अनुज्ञा दिली. त्याप्रमाणें त्यानें इंद्रसेन व इंद्रसेना हीं दोनही मुलें कुंडिनपुरास सुखरूप पोंचतीं केलीं, रथ आणि घोडे तेथेंच ठेवून वार्ष्णेय अयोध्येस निघून गेला; व तेथें ऋतुपर्णराजाचा सारथि होऊन त्याची सेवा करीत राहिला. ( वन० अ० ६० )

राजपुत्र व राजकन्या यांस घेऊन वार्ष्णेय सारथि कुंडिनपुरास गेल्यानंतर थोडेच दिवसांत पुष्करानें नलराजाचें सर्व राज्य व इतर सर्वही धन कपटद्यूतानें हिरावून घेतलें. तेव्हां पुष्कर त्यास हंसत हंसत म्हणाला:—" पुनः द्यूत खेळूं या; तुजजवळ माझे बरोबरीनें पणास लावण्यास कोणती वस्तु उरली आहे? दमयंतीखेरीज, तुझें इतर सर्वस्व मीं हिरावून घेतलें आहे. तुझी मर्जी असल्यास तूं तिला पणास लावून खेळ!' पुष्कराचें हें निर्लज्जपणाचें व नीचतेचें भाषण ऐकून नलास अतिशय राग

आला; पण तो बाहेर दिसूं न देतां व त्याच्या भाषणावर एका शब्दानेंही उत्तर न देतां नल अंगावरील सर्व दागिने काढून एका वस्त्रानिशीं राजवाड्याचे बाहेर पडला. दमयंतीही सर्व अलंकार काढून टाकून त्याचेप्रमाणेंच एक वस्त्र नेसून त्याचे पाठोपाठ बाहेर पडली ! याप्रमाणें नगराबाहेर पडल्यावर दमयंतीसह नल नजीकच तीनसाडेतीन दिवस भटकत राहिला. आपलें पूर्वीचें सद्वर्तन व वैभव आठवून किंवा निदान आपल्यावर दया करून तरी पौरजन आपणास साह्य करतील असें नलास वाटलें होतें. परंतु **त्याच्या सर्व सद्गुणांची व सद्वर्तनाची त्याच्या अलीकडील निंद्य व्यसनासक्तीनें माती करून टाकून प्रजेच्या मनांत त्याचेविषयीं तिटकाराच उत्पन्न केला होता.** त्यामुळें व नलाशीं जो कोणी चांगल्या रीतीनें वागेल त्याचा मी वध करीन, अशी पुष्करानेंही नगरांत दवंडी पिटविल्यामुळें लोकांनीं नलास कसलीही मदत केली नाहीं. त्यामुळें स्वतःच्या राजधानीसंनिध राहूनही नल-दमयंतीस तीन साडेतीन दिवस नुसतें पाणी पिऊन राहावें लागलें ! तेव्हां नल क्षुधेनें व्याकुल होऊन अरण्यांत जिकडे वाट दिसेल व जिकडे फल-मूळें मिळत तिकडे भटकूं लागला; साध्वी दमयंतीही त्याचे पाठोपाठ चाललीच होती. याप्रमाणें अरण्यांत काल कंठित असतां बऱ्याच दिवसांनीं नलास कांहीं सुवर्णदेहधारी पक्षी दिसले. ' त्यांस आपण धरलें तर त्यांचें मांस आपली क्षुधा शांत करील व त्यांचें सुवर्णही ह्या विपत्कालीं आपले उपयोगीं पडेल ' असा विचार करून नलानें आपलें नेसतें वस्त्र त्या पक्ष्यांचे अंगावर टाकून त्यांस धरण्याचा प्रयत्न केला. पण **दुर्दैवानें किंवा व्यसनासक्तीनें पछाडलेला मनुष्य लाभासाठीं जें कार्य**

करावयास जातो, तें उलटें त्याच्या अकल्याणासच कारण होत असतें. ह्या न्यायास अनुसरून त्या पक्ष्यांचें मांस किंवा सोनें नलास मिळण्याऐवजीं त्याचें द्यूतांतून अवशिष्ट राहिलेलें एक वस्त्र होतें तें मात्र ते पक्षी घेऊन गेले ! उडून जातांना, लज्जित होऊन खालीं बसलेल्या नलास ते पक्षी म्हणाले:—"मूर्खा ! आम्ही द्यूतांतले फांसे असून तूं वस्त्रानिशीं बाहेर पडलास, हें आम्हांस आवडलें नाहीं. यासाठीं आम्हीं अशा रीतीनें तुझें अखेरचें राहिलेलें वस्त्रही हरण करून नेलें आहे !' लक्षावधि अनाथांचीं अंगें झांकण्याचें ज्यास सामर्थ्य होतें तो आपला पति नग्नस्थितींत पाहून साध्वी दमयंतीनें आपले निम्मे वस्त्रानें त्याचा देह झांकिला ! द्यूतासक्तीनें आपणावरील दारुण संकटांचा याप्रमाणें कळस केलेला पाहून नंलराजा दु:खानें व पश्चात्तापानें वेडा होऊन दमयंतीस म्हणाला:—"ज्या फांशांच्या कोपामुळें माझें ऐश्वर्य गेलें व मी पोटास न मिळाल्या-मुळें भुकेनें प्राण व्याकुल होऊन अरण्यांत भटकावयास लागलों आहें व ज्यांच्यामुळें पौरजनही माझा धि:कार करीत आहेत त्यांनींच पक्ष्यांचे रूपानें येऊन माझें वस्त्रही हिरावून नेलें आहे. सांप्रत, या तुझ्या पतीवर दारुण महासंकटें आलीं असून त्यांच्या दु:खामुळें मला कशाचें भानही राहिलेलें नाहीं. याकरतां तुझ्या हिताची गोष्ट मी तुला सांगत आहें ती तूं ऐक. दक्षिणापथाकडे जाणारे हे अनेक मार्ग तूं पहा. हा एक रस्ता ऋक्षवंत पर्वत ओलांडून अवंतीकडे जात आहे, हा दुसरा कोसलानगरीकडे जात आहे. हा विंध्य पर्वत व पयोष्णी नदी पहा; त्या बाजूला ऋषींचे अनेक आश्रम असून तिकडे फलमूलेंही विपुल आहेत;

हाच रस्ता विदर्भ देशाकडे जात आहे." अशा तऱ्हेचीं भाषणें तो दमयंतीस उद्देशून वरचेवर व पुनः पुनः बोलूं लागला. तेव्हां या भाषणांचा रोख लक्षांत येऊन दमयंतीस अत्यंत दुःख झालें. कंठ दाटून येऊन व गहिंवरून ती म्हणाली:—" महाराज ! आपलीं हीं भाषणें ऐकून व आपला हेतु मनांत येऊन माझें मन उद्विग्न होत असून माझीं गात्रें कष्टी होत आहेत.

हृतराज्यं हृतद्रव्यं विवस्त्रं क्षुच्छ्रमान्वितम् ।
कथमुत्सृज्य गच्छेयं त्वामहं निर्जने वने ॥

आपलें राज्य गेलें, द्रव्य गेलें, व वस्त्रही जाऊन आपणांवर नग्नस्थितींत आणि क्षुधा व श्रम यांनीं व्याकुल होऊन वनांत भटकण्याचा दुर्धर प्रसंग आला आहे; अशा स्थितींत या निर्जन अरण्यांत आपणांस एकटें टाकून मी माहेरीं कशी निघून जाऊं ?आपणांस श्रम, क्षुधा व चिंता यांनीं वनांत होणाऱ्या दुःखाचा परिहार मी जवळ असलें म्हणजे सहज होईल. कारण:—


न च भार्यासमं किंचिद्विद्यते भिषजां मतम्।
औषधं सर्वदुःखेषु सत्यमेतद्ब्रवीमि ते ॥

"सर्व दुःखामध्यें पतिव्रता भार्येसारखें वैद्यांसही संमत असलेलें खरोखर दुसरें औषध नाहीं." दमयंतीचें हें भाषण ऐकून नल कांहींसा भानावर आला. तो तिला प्रेमानें म्हणाला:—"दमयंती, तूं म्हणतेस तें खरें आहे.

नास्ति भार्यासमं मित्रं नरस्यार्तस्य भेषजम् ।

आजारीपणांत पुरुषास भार्येसारखें दुसरें औषध नाहीं, एवढेंच नव्हे तर तिच्यासारखा दुसरा मित्रही नाहीं; हें मी

जाणून आहें. तुझा मीं त्याग करावा, असें माझ्या मनांत मुळींच नाहीं. मी एकादे वेळीं आपल्या प्राणांचा त्याग करीन पण तुझा कदापि करणार नाहीं." दमयंती:—"जर माझा त्याग करण्याची खरोखर इच्छा नाहीं, तर विदर्भ देशाची वाट अमुक आहे असें आपण मला वारंवार कां बरें सांगतां? आपण माझा त्याग करणार नाहीं, हें मला माहीत आहे. पण दुःखानें वेडावून जाऊन एकादे वेळीं आपण मला टाकून जाल, असें वाटून व विशेषतः माझ्या माहेरची वाट आपण मला वारंवार दाखवीत आहां, तें पाहून मात्र माझ्या हृदयास पीळ पडत आहे. मीं आपल्या माहेरीं जावें असेंच आपल्या मनांत असेल तर आपली मर्जी असल्यास आपण दोघेंही तिकडे जाऊं या. विदर्भराज माझा पिता तेथें आपला सत्कारपूर्वक परामर्ष घेईल; व तेथेंच वाटल्यास आपण सुखानें राहूं." (अध्याय ६१). नल:—"तुझ्या पित्याचें राज्य तें माझेंच राज्य होय, हें खरें. पण अशा दीनवाण्या स्थितींत मी सासुरवाडीस कोणत्या तोंडानें येऊं? तुझ्या स्वयंवरासाठीं जो मी मोठ्या वैभवानें व थाटानें कुंडिनपुरास गेलों, तो मी अशा स्थितींत भीमराजाकडे कसा बरें जाऊं?" याप्रमाणें विलाप करीत व एकमेकांच्या दुःखाचें सांत्वन करीत नल-दमयंती अरण्यांत भटकत होतीं. एके दिवशीं त्यांचे अत्यंत हाल होऊन त्यांस त्या दिवसांत पिण्यास पाणी किंवा खाण्यास फळेंही मिळालीं नाहींत. त्यामुळें भूक व तहान यांनीं हैराण होऊन व एकाच वस्त्रानें आपपलीं शरीरें कशींबशीं झांकून तीं हिंडत असतां त्यांस जवळच एक सभा (धर्मशाळा) दिसली. तेथें येऊन दोघेंही जमिनीवर जवळ जवळ बसलीं असतां दमयंतीला श्रमामुळें व ग्लानीमुळें झोंप



त्यानें अर्धवस्त्र नेसलेली व जमिनीवर निजलेली दमयंती पाहिली.

पृष्ठ ३५.

लागली. परंतु नलास मात्र दुःख, शोक व विचार यांमुळें झोंप येईना. आपलें गेलेलें राज्य, मित्रांनीं केलेला त्याग आणि वनवासांतील दारुण दुःखें हीं डोळ्यांपुढें येऊन त्याचे मनांत विचारांचें काहूर माजून राहिलें. " हें केलें तर काय होईल? आपण मरून जाणें श्रेयस्कर आहे काय? कीं हिलाच सोडून चालतें व्हावें? माझ्या ठिकाणीं हिचें निःसीम प्रेम आहे व ही महापतिव्रता आहे; म्हणून ही मजबरोबर वनांत दुःख व हाल सोशीत आहे. मीं हिचा त्याग केला तर ही माहेरीं जाईल व मग हिलं असले कष्ट सोसावे लागणार नाहींत. मीं हिचा त्याग केल्यावर हिचें पातिव्रत्य कोणी भ्रष्ट करील म्हणावें, तर हिच्या पातिव्रत्याचें तेज इतकें आहे कीं, असें धाडस करणाराचा ती आपल्या क्रोधाग्नीनें तात्काळ नाश करूं शकेल." याप्रमाणें अनेक प्रकारें विचार करतां करतां कलीच्या प्रभावामुळें, दमयंतीचा त्यागच करावा, असें नलाचे मनांत येऊं लागलें. " आम्ही दोघेंही एकच वस्त्र नेसलों आहों; तेव्हां तिला जागी न करतां तिचें अर्धें वस्त्र फाडून घेऊन आपणास कसें निघून जातां येईल " याचा विचार करीत नल तेथें हिंडत असतां, दुर्दैवानें त्यास अनुकूळ असें साधन त्याचे हातीं दिलें. तेथेंच एका कोपऱ्यांत नागवी तरवार ठेवलेली त्याचे दृष्टीस पडली. ती घेऊन त्यानें तिचें अर्धें वस्त्र फाडून घेतलें; व वेड्याप्रमाणें तो तिला तेथेंच एकटीला निजलेली सोडून दूर पळून गेला; पण दमयंतीप्रेमानें त्याला पुनः सभेकडे ओढून आणलें. परत येऊन पुनः त्यानें अर्धवस्त्र नेसलेली व जमिनीवर निजलेली दमयंती पाहिली; तों त्याचा शोक अनावर होऊन तो ढळढळां रडूं लागलाः—" आजपर्यंत ज्या प्रियेस वाऱ्याचा किंवा सूर्य-

किरणांचा स्पर्शही झाला नाहीं, ती आज अनाथासारखी या धर्म-शाळेंत जमिनीवर पडली आहे! अर्धें वस्त्र नेसलेली ही जागी झाल्यावर तिची कशी वेड्यासारखी स्थिति होऊन जाईल! मीं तिला येथें एकटी टाकून दिल्यावर वाघ वगैरे हिंस्र श्वापदांनीं गजबलेल्या ह्या अरण्यांत तिची कशी अवस्था होईल? हे महाभागे! आदित्य, वसु, रुद्र, मरुद्गण, अश्विनीकुमार हेच आतां तुझें संर-क्षण करोत, किंबहुना तुझा पातिव्रत्यधर्म हेंच तुझें रक्षण करणारें उत्तम साधन आहे" याप्रमाणें आपल्या निजलेल्या पत्नीशीं बोलून नल निघून गेला. कलीचा जोर त्यास एका बाजूस ओढीत होता व दमयंतीविषयींचें प्रेम त्यास पुनः धर्मशाळेकडे खेंचून नेत होतें! याप्रमाणें मन द्विधा होऊन झोंपाळ्याप्रमाणें तो एकदां दूर पळून जाई व पुनः धर्मशाळेंत येऊन निजलेल्या दमयंतीस पाहून शोक करीत असे! असें अनेक वेळां झाल्यावर अखेर पत्नीप्रेमापेक्षां कलि-संचाराचा जोर अधिक होऊन नल पक्का निष्ठुर बनला; व दमयंतीला एकटीला त्या शून्य व निर्जन अर-ण्यांत अर्धवस्त्रानिशीं निजलेलीला टाकून चालता झाला! ( अध्याय ६२ )

नलराजा निघून गेल्यानंतर निद्रेमुळें बरीच हुशारी आल्यावर दमयंती जागी झाली. पण इकडे तिकडे पाहतां पति आपल्याजवळ नाहीं, असें तिचे लक्षांत येऊन ती मोठमोठ्यानें रडून आक्रोश करूं लागली:—" महाराज! प्राणनाथ! मला या निर्जन वनांत एक-टीला कसे टाकून गेलांत? मला फार भीति वाटत आहे. महाराज, आपण धर्मज्ञ व सत्यनिष्ठ असूनही आपल्या पतिव्रता पत्नीला अनाथाप्रमाणें निजली असतां कां टाकून गेलांत? दुसऱ्यांनीं आपले

अपराध केले असतां त्याचें प्रायश्चित्त मला निरपराधी अबलेला कां दिलेंत ? लोकपाल देवांसमक्ष आपण जें वचन मला दिलें, तें खरें करा. आपण माझा त्याग केला असूनही मी अभागी क्षणभर तरी कशी जिवंत राहिलें आहे. **नेमलेली वेळ येईपर्यंत मनुष्याला मृत्यु येत नाहीं** म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. महाराज, इतकी थट्टा आतां पुरे नाहीं का झाली ? खरोखरच मला फार भीति वाटत आहे; आपण लवकर येऊन मला दर्शन द्यावें. महाराज, आपण दिसलांत, आतां मीं आपणाला पाहिलें. त्या जाळीच्या मागें लपून बसलां आहांत ! पण माझ्या बोलण्यास उत्तर कां बरें देत नाहीं ? मीं अशी एकटी येथें इतका शोक करीत असतां मजकडे येऊन माझें सांत्वन आपण करीत नाहीं, असे कसे हो आपण निष्ठुर झालांत ? मी स्वतःबद्दल किंवा दुसऱ्या कोणाबद्दल शोक करीत नाहीं; पण आपण एकटे वनांत भटकत असतां आपलें कसें होईल, हेंच मनांत येऊन मला दुःख होत आहे. दिवसभर भूक, तहान व श्रम यांनीं व्याकुल होऊन सायंकाळीं वृक्षाचे मुळाशीं मजवांचून एकटे येऊन बसलांत म्हणजे आपणांस काय वाटेल, कितीतरी दुःख होईल ? ” याप्रमाणें शोक व आक्रोश करीत दमयंती त्या वनांत वेड लागल्याप्रमाणें धांवूं लागली ! घटकाभर इकडे तिकडे पतीस शोधीत धांवावें, थकल्यावर पुनः घटकाभर पडावें; क्षणांत भिऊन कोठें तरी अडोशास लपून बसावें, क्षणांत पुनः शोक करावा; असें बिचाऱ्या दमयंतीचें चाललें होतें ! दुःख, शोक व क्रोध अनावर होऊन ती पुनः म्हणाली:—“ ज्या प्राण्याच्या शापानें माझ्या प्रियपतीस असलें दुर्धर दुःख होत आहे त्याला आमच्या दुःखाच्या शतपट दुःख होवो ! वास्तविक

पुण्यशील असलेल्या नलराजास ज्या मेल्याच्या शापानें अशी दुर्बुद्धि झाली असेल, त्याचें या जगांतून निसंतान होवो ! !" याप्रमाणें विलाप करीत व शिव्याशाप देत दमयंती त्या भयाण अरण्यांत नलाचा शोध करीत भटकत असतां, ती न कळत एका मोठ्या भुकेलेल्या अजगराचे नजीक आली. त्यानें तात्काळ तिला पकडून गिळण्यास प्रारंभ केला. अशा भयंकर समयींही **त्या पतिव्रतेस आपल्या प्राणांपेक्षां पतीचें कसें होईल, हीच चिंता वाटत होती !** ती म्हणाली:—"अहो प्राणनाथ, मला अनाथ अबलेला हा अजगर असा गिळून टाकीत असतांही अद्याप तुम्ही कांहो धांवून येत नाहीं ? शापापासून मुक्त होऊन पुनः पूर्वीची बुद्धि, मन व धन तुम्हांस प्राप्त झाल्यानंतर भुकेनें व श्रमानें म्लान झालेल्या तुमचे श्रमांचा परिहार कोण करील ?" अजगराचे तोंडांत हळु हळु जात असतां दमयंतीनें केलेला हा विलाप ऐकून एक व्याध तेथें धांवून आला. दमयंतीची ती स्थिति पाहून व्याधानें एक तीक्ष्ण शस्त्र हातीं घेऊन अजगराचा जबडा जलदीनें फाडून टाकला; व दमयंतीस बाहेर काढलें. ती बेशुद्ध स्थितींत असतांनाच त्यानें तिचें रक्तानें भरलेलें अंग पाण्यानें धुवून टाकून तिला आपल्या झोंपडींत नेलें; व तेथें तिला सावध करून त्यानें कांहीं खावयासही दिलें. व्याधानें विचारल्यावरून दमयंतीनें आपली सर्व हकीकत त्यास सांगितली. दमयंतीसारखी तरुण, सुकुमार, सुंदर, मधुरभाषिणी स्त्री एकटी व अर्धवस्त्र नेसलेल्या स्थितींत पाहतांच व्याधाचे मनांत पापवासना उत्पन्न झाली; आणि ती अनाथ व अनन्यगतिक आहे असें पाहून कामुक होऊन तो तिजवळ येऊं लागला. हें पाहतांच दमयंतीस अत्यंत तीव्र,

क्रोध येऊन त्या योगानें ती अग्नीच्या ज्योतीप्रमाणें दिसूं लागली ! व्याध कामातुर होऊन फारच लगट करूं लागतांच, मृदु बोलण्याची ही वेळ नाहीं, असें जाणून त्या **पतिव्रतेनें त्यास एकदम शाप दिला** कीं, ' **न**ळाखेरीज अन्य पुरुषाचें मी नुसत्या मनानेंही जर चिंतन आजपर्यंत केलें नसेल, तर हा पापी व क्षुद्र व्याध प्राण सोडून भूमीवर पडो !' **पतिव्रतेच्या तोंडून ही शापवाणी बाहेर पडतांच, तो पापी कामुक** वणव्यानें किंवा विजेनें जळलेल्या वृक्षाप्रमाणें **गतप्राण होऊन भूमीवर पडला !** ( वनपर्व, अध्याय ६३ )

आपल्या पातिव्रत्य-तेजानें व सात्विक क्रोधाग्नीनें याप्रमाणें त्या व्याधाचा नाश केल्यावर दमयंती हिंडत हिंडत अत्यंत निबिड, दुर्गम व भयंकर अशा अरण्यांत शिरली. तेथें बराच वेळ हिंडून थकल्यावर दमयंती एका शिलेवर बसून पुनः नळासाठीं विलाप व शोक करूं लागली ! ती म्हणाली:—" महाराज, आपण अश्वमेधादि अनेक यज्ञ-याग केले आहेत व चारी वेदांचें सांग अध्ययनही केलेलें आहे. परंतु **ह्या सर्व यज्ञयागांपेक्षां व वेदाध्ययनापेक्षां नुसत्या सत्याची योग्यता फार मोठी आहे.** हंसाचें जें भाषण आपणापाशीं व माझ्यापाशीं झालें त्याची आठवण करा. ' तुजवांचून मला दुसरी कोणतीही स्त्री जगांत प्रिय नाहीं ' असें जें भाषण पूर्वी आपण केलें तें आतां खरें करा. कळपांतून चुकलेल्या एकाद्या गरीब हरिणीप्रमाणें मी या भयाण अरण्यांत एकटी व दीनवाणी फिरत असतां आपण माझी हांक व विलाप ऐकून धांवून कसे येत नाहीं ? ' माझे प्राणनाथ तुम्हीं पाहिलेत काय ' असें मी या निर्जन अरण्यांत कोणास विचारूं ? व मला उत्तर तरी

कोण देणार? 'हा पहा तुझा नलराजा' असें मधुर भाषण मला कधीं तरी ऐकावयास मिळेल काय? मी असा शोक करीत असतां एकदम 'अगे दमयंती, वैदर्भी' अशी आपली स्निग्ध, गंभीर व मनोहर वाणी मला ऐकूं येईल काय?" याप्रमाणें अनेक प्रकारें शोक करीत दमयंती बसली होती. कांहीं वेळानें ती पुनः त्या वनांत हिंडूं लागली. आपला भयंकर व प्रचंड जबडा पसरून पर्वतावर उभा असलेला वाघ पाहिला कीं, तिनें आपली व आपल्या पतीची सर्व हकीकत सांगून व पतिव्रतेस साजेल अशी नलाची स्तुति व गुणवर्णन करावें व त्याची वार्ता पुसावी; आणि 'ती सांगत नसशील तर मला खाऊन टाकून तरी माझी या दुःखांतून मुक्तता कर' अशी त्यास विनंति करावी! त्या अरण्यांतील वनदेवतेचे जणों शेंकडों ध्वजच अशीं उंच शिखरें असलेल्या पर्वतांसही हीच काहणी सांगून, 'इतक्या उंच उंच माना करून पाहणाऱ्या तुम्हांस माझा पति दिसला काय' असें दीनवाणीनें तिनें विचारावें! फुललेला मोठा अशोक वृक्ष दिसला कीं, पुनः आपलें दुःख त्यास दमयंतीनें निवेदन करावें, नलाची बातमी विचारावी, व 'माझा शोक नाहींसा करून आपलें 'अशोक' हें नांव सार्थ कर' असें त्यास म्हणावें! अशा प्रकारें अर्धवट शुद्धींत अर्धवट वेडांत ही पतिव्रता राजस्त्री त्या वनांतून उत्तर दिशेच्या रोंखानें तीन अहोरात्र भटकली. तों तिला एकदम तपस्व्यांचें अत्यंत रमणीय असें आश्रममंडळ एका नदीचे तीरीं दिसलें. ती त्या वेशानें व त्या स्थितींत या आश्रमांत शिरली असतां तेथील तपस्व्यांनीं तिचें सौंदर्य, विनय व तेज पाहून तिचें चांगलें आदरातिथ्य केलें, व तिची विचारपूस केली. तिनें सर्व हकीकत त्यांस इत्थंभूत निवे-

दन केल्यावर, 'नलराजाची व तुझी लवकरच पुनः भेट होईल व त्याचें राज्यही त्यास परत मिळेल, असें त्यांनीं तिला वारंवार आश्वासन दिलें. इतक्यांत ते ऋषि, तें तपोवन व ते आश्रम हीं सर्व एकदम स्वप्नवत् गुप्त होऊन गेलीं! पुनः अरण्यांत भटकणें व व थकलें कीं झाडाखालीं किंवा शिलेवर बसून शोक करणें, हा दमयंतीचा क्रम सुरू झाला. याप्रमाणें बरेच दिवस गेल्यावर त्या अरण्यांतील मार्गानें जाणारा व्यापाऱ्यांचा एक मोठा तांडा तिचे दृष्टीस पडला. त्या तांड्याबरोबर मालानें लादलेले अनेक हत्ती, घोडे व रथ असून त्या तांड्याचा 'शुचि' नांवाचा एक वैश्य पुढारी होता. हा तांडा दमयंतीचे दृष्टीस पडला, तेव्हां तो एक मोठी रुंद व खोल आणि वेतांचे बेटांनीं आच्छादलेली नदी ओलांडून परतीरीं जात होता. फारा दिवसांनीं हे मनुष्यप्राणी दिसतांच दमयंती या लोकांमध्यें शिरली. दमयंतीचें तें अर्धवट झांकलेलें व मलिन झालेलें अंग, तो विचित्र वेष, जटा झालेले केश व कृश झालेलें पण सुंदर व सतेज शरीर पाहून ते वैश्य आपसांत कुजबुजूं लागले. कित्येक तिला भ्याले, कित्येकांस चिंता वाटूं लागली; कित्येकांनीं तिचा उपहास केला, तर कित्येकांचे मनांत तिचें रूप पाहून पापवासनाही उत्पन्न झाली. पण कित्येकांस दया येऊन त्यांनीं तिला विचारलें, 'तूं कोण यक्षिणी-राक्षसी आहेस, कीं ह्या वनाची अथवा नदीची देवता आहेस? आमचा हा तांडा सुरक्षित स्वस्थलीं पोंचून त्यास चांगली किफायत होईल अशी कृपा आम्हांवर कर.' हें भाषण ऐकून दमयंतीनें पुनः त्यांस आपली सर्व हकीकत सांगून 'नलराजा पाहिलात काय?' असा प्रश्न केला. त्या तांड्याचा पुढारी शुचि यानें उत्तर केलें कीं, 'नल नांवाचा

पुरुष आम्ही अद्याप कानांनींही ऐकलेला नाहीं, मग पाहणार कोठला? तुझ्यावांचून ह्या अरण्यांत आम्हांस एकही मनुष्य प्राणी दिसला नाहीं. यक्षराज मणिभद्र आमचें कल्याण करो!' वैश्यांचा हा तांडा चेदीदेशचा राजा सुबाहु याचे राजधानीस व्यापाराकरतां जात आहे, असें दमयंतीला त्या पुढाऱ्याकडून कळलें; तेव्हां ती त्याचे परवानगीनें त्यांचेबरोबरच मार्गक्रमण करूं लागली. ( वन० अ० ६४ )

वैश्यांच्या तांड्याबरोबर याप्रमाणें बरेच दिवस दमयंती वाट चालत आली; तरी तिच्या मागचें दुर्दैवाचें शुक्लकाष्ठ अद्याप संपलें नव्हतें. एके दिवशीं सायंकाळीं या व्यापाऱ्यांनीं एका मोठ्या चौकोनी तलावाचे पश्चिम तीरावर मुक्काम केला; व त्यांनीं आपापले हत्ती, घोडे व रथ सोडून ठिकठिकाणीं बांधले. त्या दिवशीं मध्यरात्रीचे सुमारास त्या वनांतील रानहत्तींचा मोठा कळप त्या तलावावर पाणी पिण्यास आला. गांवठी व माणसाळलेल्या हत्तींच्या मदानें दरवळलेलें तें पाणी पाहून रानहत्तींस मस्ती आली; व त्यांनीं ह्या तांड्याचे तळांत शिरून गांवहत्तींशीं झुंजण्यास सुरुवात केली. ह्या झुंजीमुळें सर्वत्र गडबड उडून व्यापाऱ्यांच्या बहुमोल मालाची नासाडी झाली; त्यांचे कित्येक उंट, घोडे व हत्ती एवढेंच नव्हे तर माणसेंही मेलीं! कित्येक भीतीनें रात्रींच अंधारांत पळाले; कित्येक खड्ड्यांत व दऱ्याखोऱ्यांत पडले; व कित्येक झाडांवर चढून बसले! तळांत ही गडबड उडतांच दमयंती भयभीत व आपल्याच ठिकाणीं गर्भगळित होऊन बसली होती. रानहत्तींच्या तडाख्यांतून जे थोडे बहुत वैश्य वांचले होते, ते आपसांत बोलूं लागले कीं, ' आपल्या तांड्याचा हा नाश कोणाचे कर्मामुळें झाला

असावा ? यक्षराज माणिभद्र, कुबेर किंवा विघ्नदेवता यांची पूजा आपण न केल्याचा हा परिणाम आहे, असें कित्येक म्हणूं लागले; कित्येकांचे मतें अपशकुन व दुष्ट ग्रह यांचें हें फळ असावें; कित्येक म्हणूं लागले कीं, ' आपल्या तांड्याबरोबर जी एक स्त्री येत आहे ती यक्षीण किंवा राक्षसी असावी; व तिच्या दुष्ट मायेनें आपलें हें नुकसान झालें असावें. त्या कृत्येला जर पुनः पाहिली तर आपण मातीच्या ढेकळांनीं, दगडधोंड्यांनीं व काठ्यांनीं तिला मारून टाकूं ! ' हें त्या व्यापाऱ्यांचें निर्दयपणाचें भाषण ऐकून पुनः दमयंती भिऊन अरण्यांत वाट सांपडली तिकडे पळून गेली ! व्यापाऱ्यांचे तडाक्यांतून सुटून दूर गेल्यावर ती आपल्या एकंदर स्थितीचा व दैवाच्या दारुण दुर्विलासाचा आपल्याशींच विचार करूं लागली. " माझ्यावर दुर्दैवाचे इतके असह्य घाले कां पडत आहेत ? **मनानें, वाचेनें किंवा कृतीनें मीं कोणाचेंही अत्यल्प सुद्धां अहित केलेलें नसतांही मला असे हाल व विपत्ति हीं भोगावीं लागत आहेत, हें पूर्वजन्मीं केलेल्या कर्माचें तर फल नसेल ना !** माझ्या पतीचें राज्य गेलें. स्वजनांनीं आमचा त्याग केला. मला नलराजानेंही वनांत टाकून दिलें; माझ्या दोन्ही लेकरांसही मी अंतरलें, व अनाथ होऊन वनांत भटकूं लागलें. ह्या निर्जन अरण्यांत व्यापाऱ्यांचा तांडा भेटून त्यांच्या पुढाऱ्यानें मला आश्रय दिला. पण माझ्या दुर्दैवामुळेंच ह्या व्यापाऱ्यांचा व त्यांच्या मालाचा नाश झाला. पण मला अभागिनीला मात्र एकाही हत्तीनें पायाखालीं तुडवून ठार मारलें नाहीं ! लहानपणींसुद्धां किंवा चुकूनही मीं कोणाचें जर अकल्याण चिंतिलें नाहीं, तर दैव माझ्या मागें असें हात धुवून कां पाठीस लागलें आहे ? स्वयंवराचे वेळीं चार लोकपाल देवांचा

त्याग करून मीं नलास वरिलें, त्यामुळें झालेल्या देवांच्या कोपाचें तर हें फल नसेल ना ? " याप्रमाणें दमयंती आपल्या दुर्दैवास दोष देत असतांनाच **त्या पतिव्रतेचें सुदैव उघडण्याचा समय जवळ येत चालला होता.** त्या व्यापाऱ्यांच्या तांड्याबरोबर असलेले कांहीं ब्राह्मण तिला भेटले. त्यांस तिची दया आली; व तिला बरोबर घेऊन ते चेदीराजा सुबाहु याच्या राजधानीस आले. अत्यंत मलिन व अर्धें वस्त्र नेसून वेड्यासारखी हिंडणारी ही स्त्री पाहतांच रस्त्यांतील वात्रट पोरें तिचे मागें लागून तिला त्रास देऊं लागलीं ! राजरस्त्यावरून याप्रमाणें फिरतां फिरतां ती राजवाड्यानजीक आली; तों गच्चीवर राजमाता बसली होती, तिचें लक्ष दमयंतीकडे गेलें. दमयंतीची एकंदर स्थिति दीन व करुणास्पद होऊन तिचा चेहरा म्लान, खिन्न व कृश जरी झाला होता, तरी तिचें भूषणविहीन असलेलें लावण्य राजवाड्यासही शोभा देणारें आहे, हें त्या चतुर राजमातेच्या तेव्हांच लक्षांत आलें. तिनें दाईला खालीं पाठवून दमयंतीस वर आणविलें; आणि 'मनुष्यांत दुर्मिळ अशा रूपानें युक्त असूनही तुला अशी स्थिति कां प्राप्त झाली ' म्हणून कळवळ्यानें व मायेनें तिला विचारलें. तेव्हां नलाचें व आपलें नांव किंवा राहण्याचें ठिकाण हीं न सांगतां बाकीची सर्व हकीकत डोळ्यांत आंसवें आणून दमयंतीनें राजमातेस सांगितली; आणि ती म्हणाली:—" आपल्या पतीचा शोध करीत हिंडणारी मी एक दीन, अनाथ पण कुलीन अशी सैरंध्री आहें. मी वाटेल तेथें राहतें व फिरतें, सायंकाळ झाला कीं मुक्काम करतें, व जीं फळें-मुळें सांपडतील त्यांवर निर्वाह करतें." दमयंतीचें हें भाषण ऐकून व तिची दया येऊन राजमाता तिला

म्हणाली:—" तुला पाहून माझें मन तुजकडे ओढ घेत आहे. तूं येथेंच मजजवळ रहा. माझे नोकर तुझे पतीचा शोध करतील, किंवा कदाचित् तोच आपण होऊन इकडे येईल. तूं सुखानें व आनंदानें मजपाशींच रहा." राजमातेचें हें मायेचें भाषण ऐकून दमयंती म्हणाली:—" मी तुम्हांजवळ राहतें; पण माझ्या अटी तुम्हांस मान्य असल्या तरच मी राहीन. मी कोणाचें उष्टें खाणार नाहीं किंवा कोणाचे पाय धुणार नाहीं. माझ्या पतीचा शोध करण्याकरतां मी फक्त ब्राह्मणांपाशीं बोलेन; त्यांजवांचून अन्य पुरुषांशीं भाषणही करणार नाहीं. माझ्या वाटेस जाणाऱ्या पुरुषास तुम्हीं शासन केलें पाहिजे; व जो मला वारंवार त्रास देऊं लागेल त्याचा वधही केला पाहिजे." दमयंतीच्या ह्या सर्व अटी आनंदानें मान्य करून राजमातेनें सुनंदा नांवाच्या आपल्या राजकन्येस हांक मारली. आणि ' रूप, गुण व वय यांनीं ही सैरंध्री तुला योग्य मैत्रीण आहे, तिला घेऊन जा व तिजशीं मैत्रिणीच्याच नात्यानें वाग ' असें तिनें तिला सांगितलें. सुनंदा दमयंतीस मोठ्या आनंदानें आपल्या वाड्यांत घेऊन गेली. येथें आल्यापासून मात्र दमयंतीचे वनवासाचे हाल व कष्ट संपून ती सामान्यतः बऱ्याच समाधानानें राहूं लागली. ( वनपर्व अ० ६५ )

इकडे धर्मशाळेमध्यें निजलेल्या दमयंतीस एकटी टाकून नल गहन अरण्यांत शिरला; तों त्यास चोंहोंकडे वणवा पेटलेला दिसला. ' इतक्यांत हे महात्म्या नला, धांव ' याप्रमाणें वणव्यांत सांपडलेला कोणी प्राणी आपणास हांक मारीत आहे, असें नलास ऐकूं आलें. ' भिऊं नको ' असें प्रत्युत्तर देऊन, जिकडून हांक आली तिकडे नल धांवत गेला. तेथें वणव्याचे मध्यें सांपडून भयभीत

होऊन वेटोळें घालून बसलेला एक नाग त्याचे दृष्टीस पडला. नलास पाहतांच नाग त्यास म्हणालाः—" मीं कर्कोटकनामक नाग असून, माझ्या हातून नारदाचा उपमर्द झाला; त्यामुळें त्यांनीं दिलेल्या शापाचे योगानें मी येथें निश्चल होऊन पडलों आहें. मला येथून त्वरित उचलून घेऊन तूं या वणव्यांतून वांचीव; मी तुझ्या उपकारांची फेड केल्यावांचून राहणार नाहीं." असें बोलून, नलाला सहज नेतां यावें म्हणून, कर्कोटकानें आंगठ्या एवढें लहान रूप धारण केलें. नलानेंही त्यास तेथून उचलून व वणव्यांतून काढून सुस्थळीं आणलें. तेथें तो नागास सोडून देणार, इतक्यांत तो नलास म्हणाला 'कांहीं पावलें मोजीत मजसह जा, व मग मला सोड.' त्याप्रमाणें नलानें दहा पावलें मोजून '' **दश** ' ( दहा, पक्षीं चाव ) असें म्हणतांच कर्कोटकानें त्यास दंश केला ! त्यासरशीं त्याच्या विषानें नलाचें सर्व रूप नष्ट होऊन तो अत्यंत कुरूप झाला, व त्याचा एक हातही लहान झाला; आणि नागास पुनः पूर्वरूप प्राप्त झालें ! ! आपणावर हें नवीनच अरिष्ट येत आहे कीं काय, असा विचार नल करीत होता. **परंतु परोपकार करीत असतां भोगावें लागलेलें संकट किंवा विपत्ति हीं परिणामीं सुफलदायीच होत असतात.** त्याप्रमाणेंच कर्कोटकाचा हा दंश झाला. कर्कोटकानें त्याचें असें सांत्वन केलें:—" लोकांनीं तुला ओळखूं नये, म्हणून मी आपल्या विषाचे प्रभावानें तुझें मूळचें रूप मुद्दामच नाहींसें केलें आहे. माझें हें विष तुझ्या अंगांत भिनलें असल्यामुळें ज्या कलीनें तुला मत्सरानें व नीचपणानें या स्थितीस आणलें, त्यास तुझ्या शरीरांत राहणें फार दुःखप्रद होईल. शिवाय यापुढें इतर कोणत्याही नागाचें विष तुला

बाधणार नाहीं; एवढेंच नव्हे, शत्रु किंवा ब्रह्मवेत्त्यांचे शाप यांचीही तुला इतउत्तर भीति बाळगावयास नको. या विषाची पीडा तुला मुळींच न होतां तुला रणांत नेहमीं विजय प्राप्त होईल. यापुढें तूं बाहुक हें नांव धारण करून सारथी हो व अयोध्यानगरीस जा. तेथील ऋतुपर्ण राजा अश्वांचा मोठा शोकी आहे. त्यास ‘ अश्व-हृदय ’ विद्या शिकवून त्याजपासून तूं ‘ अक्षहृदय ’ विद्या शीक. ही विद्या तुला प्राप्त झाल्यावर लवकरच तुझी व तुझ्या पत्नीची आणि कन्या-पुत्रांची भेट होईल. एवढेंच नव्हे तर निषधदेशाचें राज्यही तुला परत मिळेल; तूं अगदीं चिंता करूं नको. आपलें पूर्वरूप प्राप्त व्हावें अशी जेव्हां तुला इच्छा होईल, तेव्हां माझें स्मरण करून हीं दोनही वस्त्रें तूं परिधान कर, म्हणजे तूं पूर्व-वत् रूपसंपन्न होशील. ” असें बोलून व नलराजास दोन दिव्य वस्त्रें देऊन कर्कोटक नाग गुप्त झाला ! ( वन० अध्याय ६६ )

नागानें सांगितल्याप्रमाणें नलराजा निघाला; तो दहावे दिवशीं अयोध्येंत ऋतुपर्णराजाकडे आला व त्यास म्हणालाः—‘ मी बाहुक नांवाचा सारथि असून मला अश्वविद्या उत्कृष्ट येते. शिवाय अर्थशास्त्र, शिल्पविद्या, कलाकौशल्य व अन्नसंस्कार यांमध्येंही मी प्रवीण आहें. मला आपल्या पदरीं ठेवावें ’ ऋतुपर्णराजानें त्याची ही विनंति मान्य करून त्यास आपलेजवळ ठेवलें. आणि शीघ्रयानाचा त्यास फार शोक असल्यामुळें त्यानें त्यास अश्वा-ध्यक्ष नेमून वार्ष्णेय व जीवल हे सारथि त्याचे हाताखालीं दिले, आणि त्यास १० हजारांचें वेतन चालू केलें. ऋतुपर्णाचे पदरीं अश्वाध्यक्ष या नात्यानें नलराजा राहत असतां त्यास अर्थात्च

दमयंतीचें वारंवार स्मरण होत असे. रोज सायंकाळीं काम आटो-
पून तो स्वस्थ बसला, म्हणजे

**क नु सा क्षुत्पिपासार्ता श्रांता शेते तपस्विनी ।**
**स्मरंती तस्य मंदस्य कं वा साऽऽद्योपतिष्ठति ॥**

( तहान, भूकेनें व श्रमानें व्याकुल होऊन व त्या मूढाची आठवण करीत ती बिचारी कोठें बरें निजली असेल ? किंवा ती कोणाकडे बरें गेली असेल ? ) हा श्लोक मोठ्यानें पण आपल्याशींच वारंवार म्हणत शोक करीत असे. बाहुकाचें हें रोजचें चमत्कारिक वर्तन पाहून जीवल सारथ्यानें एके रात्रीं त्यास पुशिलें:—' बाहुका, तूं रोज असा कोणत्या स्त्रीसाठीं शोक करीत बसतोस ?' बाहुकः— " एका मूर्खानें एके वेळीं आपली पतिव्रता भार्या विनाकारण टाकून दिली. नंतर तो तिच्या विरहानें दुःखित होऊन भटकत फिरत असे व रात्रीं तिची आठवण झाली, म्हणजे वारंवार हा श्लोक म्हणून तो सांप्रत शोक करीत असतो. त्या पुरुषावर महान् संकटें आलीं, तेव्हां ती साध्वी त्याजबरोबर वनांत गेली; पण त्या पाप्यानें मात्र तिचा त्याग केला. ती एकटी व अनाथ असून तिला वनांतले रस्तेही माहीत नव्हते आणि अशा दुःखाची तिला कधीं संवयही नव्हती. अशी ती स्त्री हिंस्र पशूंनीं भरलेल्या अरण्यांत एकटी सैरावरा धांवत असतां जिवंत राहणें परम दुर्घट आहे " अशा प्रकारच्या उत्तरांनीं वेळ मारून नेत नलराजा अयोध्येंत अज्ञातवासाचे दिवस कंठीत होता ! ( वन० अ० ६७ )

पुष्करानें निषध देशाचें सर्व राज्य व नलाचें सर्वस्व द्यूतामध्यें हरण करून त्यास व दमयंतीस वनवास करावयास लावल्याचें वर्त-

मान भीमराजास कळलें. तेव्हां त्यानें पुष्कळ ब्राह्मण बोलावून आणिले; व त्यांस बहुत द्रव्य देऊन सांगितलें कीं, नल किंवा दमयंती हीं कोठें आहेत, याचें वर्तमान शोध करून तुम्हीं मला कळवावें. या कार्यांत ज्यास यश येईल त्यास मीं एकहजार गाई देईन. त्यांचा शोध लावून त्यांस जो येथें घेऊन येईल त्यास याशिवाय मी एक मोठें गांव व इतर अग्रहार देऊन संतुष्ट करीन.' भीमराजाचें हें भाषण ऐकून विदर्भदेशचे शेंकडों ब्राह्मण नलदमयंतीचा शोध करण्यासाठीं निघाले. ते अनेक देश, नगरें व राज्यें यांतून हिंडले; परंतु त्यांस त्यांचा कांहींच पत्ता लागला नाहीं. पण यांपैकीं सुदेव नांवाचा ब्राह्मण शोध करीत करीत चेदि देशच्या राजधानींत आला होता. तेथें राजवाड्यांत पुण्याहवाचनाचे वेळीं राजभगिनी सुनंदा हिचेजवळ बसलेली एक सुंदर, पण मलिन व व कृश झालेली स्त्री त्याचे नजरेस पडली. बराच वेळ तिजकडे सूक्ष्म दृष्टीनें पाहिल्यानंतर दमयंती ती हीच असें सुदेवानें ओळखलें; व इष्ट कार्य सफल झालेलें पाहून त्यास कृतकृत्यता वाटली. परंतु वीरकन्या, वीरपत्नी व वीरमाता असलेल्या दमयंतीची ती दीन स्थिति पाहून सुदेवास या आनंदामध्येंही दुःख वाटलें. अशा प्रकारच्या लावण्यवती, सद्गुणी व पतिव्रता स्त्रीचा त्याग नलाला कसा करवला, तो याचेंच आश्चर्य करीत होता.

**भर्ता नाम परं नार्या भूषणं भूषणैर्विना ।**

**दागदागिने नसले तरी साध्वी स्त्रियांस पति हाच सर्वांत श्रेष्ठ असा अलंकार आहे.** त्याचा वियोग झाल्यामुळें दमयंती सुंदर असूनही शोभेनाशी झाली होती. अशा प्रकारच्या कष्टमय स्थितींत काळ कंठणाऱ्या राजस्त्रीचें दुःख आपण अवश्य हलकें केलें

पाहिजे, असें वाटून सुदेव दमयंतीकडे जाऊन एकदम म्हणालाः— ' हे वैदर्भि, मी तुझ्या भावाचा प्रियमित्र सुदेव आहें. भीमराजाचे आज्ञेवरून तुझा व तुझ्या पतीचा शोध करण्यास मी इकडे आलों आहें. तुझे मातापिता, तिघे भाऊ व कन्यापुत्र कुंडिनपुरांत सुखरूप आहेत. पण तुम्हीं उभयतां नाहींशीं झाल्यापासून तेथील सर्व आप्तेष्ट मंडळी अत्यंत शोक करीत आहेत.' सुदेवास पाहून व त्याच्या तोंडून हे शब्द ऐकून दमयंतीचा कंठ एकदम दाटून आला. ती माहेरच्या माणसांसंबंधानें आणखी विचारपूस करूं लागली, तों तिला दुःखाचा जास्तच उमाळा येऊन ती मोठमोठ्यानें हुंदके देऊन रडूं लागली व तिचे तोंडून शब्दही उमटेना ! हा विलक्षण प्रकार सुनंदेनें आपल्या आईस कळवून दमयंती व सुदेव बोलत बसले होते तेथें ती तिला घेऊन आली. ही सैरंध्री कोणाची कोण? माहेरचीं माणसें किंवा पति यांशीं हिची ताटातूट कशी झाली? व तुम्हीं हिला कशी ओळखली, असे प्रश्न राजमातेनें सुदेव ब्राह्मणास विचारले. तेव्हां त्यानें तिला सर्व हकीकत निवेदन केली. ( अध्याय ६८ ) ' दमयंतीच्या दोन भिंवयांच्या मध्यें जन्मापासून वैभवसूचक असा एक मोठा ' पिप्लु ' ( तीळ ) आहे; तो सांप्रत कांहींसा मलीन झालेला असला तरी तो मला दिसला, व त्यावरून मीं तिला ओळखलें ' असेंही सुदेवानें तिला सांगितलें. हें ऐकून सुनंदा व राजमाता अत्यंत विस्मित झाल्या. सुनंदेनें सैरंध्रीच्या भिंवयांचा मध्यभाग धुवून काढला, तेव्हां तिला तेथें तो तीळ स्पष्ट दिसला. लागलींच राजमाता दमयंतीस पोटाशीं धरून रडूं लागली; सुनंदाही तिला आलिंगन देऊन शोक करूं लागली. दुःखाचा उमाळा शांत झाल्यावर डोळे

पुसून राजमाता म्हणाली:—" दमयंती, तूं माझ्या सख्या बहिणीचीच मुलगी आहेस, असें ह्या तिळावरून आतां मला कळलें. दशार्ण देशचा राजा सुदामन् ह्याच्या, तुझी आई व मी, ह्या दोघी कन्या आहों. तिला त्यानें भीमराजास दिली, व मला चेदिराजा वीरबाहूला दिली. दशार्ण देशांत अजोळींच तुझा जन्म झाला; त्याच वेळीं हा तीळ मीं पाहिला होता. तुझ्या माहेराप्रमाणेंच हें माझें घर समजून येथें सुनंदेच्या बरोबरीची राजकन्या या नात्यानें खुशाल रहा. " आपल्या मावशीचें हें भाषण ऐकून आनंदित होऊन दमयंतीनें तिला नमस्कार केला; व ती म्हणाली:—" मी कोण हें माहीत नसतांही तुम्हीं माझी दीन स्थिति पाहून मला आश्रय दिला; व मला दासीप्रमाणें न मानतां राजकन्येची मैत्रीण या नात्यानें वागविलें व माझें पालनपोषण केलें. माझी आतां ओळख पटल्यावर तर तुम्ही मला अधिकच मायेनें वागवाल हें खरें. परंतु, मी तुमच्या येथें बरेच दिवस राहिलें आहे; तेव्हां आतां मला जाण्याची अनुज्ञा द्यावी. माझीं बाळें आज बरेच दिवस तेथें एकटीं आहेत. त्यांस पित्याचें सुख लाभलें नाहींच, पण यापुढें मातृसुखास तरी त्यांना अंतर देऊं नको. माझें जर एकादें प्रिय तुला करावयाचें असेल तर मला लवकर विदर्भ देशांत पित्याकडे पाठवून दे ! " **पतिप्रेमाचे दडपणाखालीं आजपर्यंत दबून राहिलेल्या दमयंतीच्या अपत्य-प्रेमास अशा रीतीनें एकदम उसळी आली;** व तिला विदर्भ देशांत एकदां केव्हां जातें असें होऊन गेलें. राजमातेनें तिच्या प्रयाणाची त्वरित तयारी केली; व बरोबर सैन्य देऊन तिची बंदोबस्तानें विदर्भ राजधानीकडे रवानगी केली. दमयंती याप्रमाणें माहेरीं येऊन पोंचल्यावर

सर्वांस आनंद झाला. आईबाप, आपले भाऊ, आपलीं दोनही मुलें, मैत्रिणी हीं सर्व कुशल आहेत, असें पाहून दमयंतीलाही समाधान वाटलें. तिनें देवतांचा उत्सव करून ब्राह्मणांसही दानें दिलीं. मुलगी दृष्टीस पडतांच भीमराजानें सुदेवास १ हजार गाई, पुष्कळ धन व एकगांव देऊन त्यास संतोषित केलें. ती रात्र उजाडल्यावर सकाळीं दमयंती उठली. सर्वांच्या भेटी होऊन तिला थोडेंबहुत समाधान वाटलें. तरी पतीचा शोध न लागल्यामुळें दमयंतीस खरें सुख लवलेशही नव्हतें. भीडमर्यादा थोडीशी बाजूस ठेवून ती आपल्या आईस स्पष्ट म्हणाली:—" आई, मी तुला खरेंच सांगतें; **पतीची भेट जर लवकर न होईल तर मी कांहीं फार दिवस जगणार नाहीं.** मी जिवंत राहावें, अशी जर तुझी इच्छा असेल तर त्या नरवीर नलराजाचा शोध करून त्यास हरप्रयत्नानें येथें आणण्याची खटपट करा. " दमयंतीचें हें निर्वाणीचें भाषण ऐकून तिचे आईस गहिंवर आला व तिच्यानें कांहींच उत्तर देववेना. तिनें भीमराजाकडे जाऊन दमयंतीचें हें बोलणें त्यास कळविलें. त्यानें पुनः अनेक ब्राह्मण जमवून नल-राजाचे शोधासाठीं त्यांस देशोदेशीं पाठविण्याचें ठरविलें. निघण्यापूर्वी राजाच्या आज्ञेवरून ते सर्व ब्राह्मण दमयंतीकडे आले. तेव्हां ती त्यांस म्हणाली:—" सर्व देशांत हिंडून लोक-समूह जमण्याचीं जीं जीं ठिकाणें असतील तेथें तेथें मीं आतां सांगतें याप्रमाणें म्हणत जा:—' आपल्या पतिव्रता व प्रिय भार्येस वनांत निजलेली एकटी टाकून तिचें अर्धें वस्त्र फाडून घेऊन व अशा रीतीनें तिला ठकवून प्राणप्रिया कोठें गेलांत? आपण ज्या स्थितींत तिचा त्याग केलांत त्याच स्थितींत-तेंच अर्धें वस्त्र अजूनही नेसून-ती तुमची,

मार्गप्रतीक्षा करीत व दुःखानें जळत बसली आहे. अहोरात्र तिचे डोळ्यांचे पाण्यास खळ नाहीं. अशा प्रकारचा हृदयभेदक शोक करणाऱ्या आपल्या भार्येवर कृपा करा, व आमच्या भाषणास प्रत्युत्तर द्या.

भर्तव्या रक्षणीया च पत्नी हि पतिना सदा ।

**पत्नीचें सदैव योग्य पोषण व संरक्षण करणें हा पतीचा धर्म आहे.** पण तुम्हीं धर्मज्ञ असूनही यांपैकीं एकही कसें करीत नाहीं? तुम्ही शाहणे, कुलीन व दयाळू आहांत, अशी तुमची योग्य ख्याति असूनही तुम्हीं निर्दयपणें माझा त्याग केला, याचा दोष तुम्हांकडे नाहीं; हा माझ्या दुर्दैवाचाच खेळ आहे. **आनृशंस्यं परो धर्मः 'दयालुत्व हाच श्रेष्ठ धर्म होय'** हें तत्त्व मीं आपलेच तोंडून वारंवार ऐकिलें आहे; याकरितां, हे नरवीरा, मजवर दया करा." अशा तऱ्हेचें व त्यांची मजवर कृपादृष्टि होईल अशा प्रकारचें इतरही भाषण करीत तुम्हीं हिंडावें. ह्या भाषणास जो कोणी प्रत्युत्तर देईल त्याच्या संबंधानें चौकशी करा. उत्तर देणारा पुरुष श्रीमान् असो वा दरिद्री असो, सुरूप असो वा कुरूप असो, समर्थ असो वा दुर्बळ असो, त्याच्या मनांतील हेतु तुम्ही काढून घ्या. तुम्ही हीं भाषणें माझ्या आज्ञेनें करीत आहां ही गोष्ट किंवा तुमचें आगमन कोणीकडून झालें हें त्यास कळतां उपयोगी नाहीं. तुमच्या ह्या भाषणास जें प्रत्युत्तर येईल तें मजकडे येऊन कळवा."

याप्रमाणें भाषण झाल्यावर दमयंतीचा निरोप घेऊन ते ब्राह्मण चारी दिशांस नलराजाचा शोध करण्यास गेले. त्यांनीं अनेक देशांतील नगरें, गांवें, आश्रम व गौळवाडे धुंडाळले; व प्रत्येक ठिकाणीं दमयंतीनें सांगितल्याप्रमाणें वाक्यें उच्चारिलीं. तरी कोणी प्रत्युत्तर

दिलें नाहीं, व नलाचा पत्ताही लागला नाहीं. ( वन० अ० ६९ )

इतर सर्व ब्राह्मणांची जरी निराशा झाली तरी पर्णाद नांवाचा ब्राह्मण अयोध्येस गेला होता, त्यानें मात्र दमयंतीनें सांगितलेलें कार्य केलें. ऋतुपर्णाचे राजसभेंत जाऊन त्यानें दमयंतीनें सांगितल्याप्रमाणें गूढ सवाल टाकले; परंतु त्यास राजाकडून किंवा सभासदांकडून जबाब मिळाला नाहीं. तथापि राजाचा निरोप घेऊन हा ब्राह्मण जाऊं लागला असतां, बाहुक सारथ्यानें त्यास एकांतांत गाठलें; कांहीं वेळ शोकाचा आलेला उमाळा बाहेर पडूं देऊन, नंतर त्यानें त्याच्या सवालाचा जबाब दिला. तो म्हणाला:—

" वैषम्यमपि संप्राप्ता गोपायंति कुलस्त्रियः ।
आत्मानमात्मना सत्यो जितः स्वर्गो न संशयः ॥
रहिता भर्तृभिश्चैव न कुप्यंति कदाचन ।
प्राणांश्चारित्र्यकवचान् धारयंति वरस्त्रियः ॥

**महासंकट प्राप्त झालें असतांही ज्या स्त्रिया कुलीन आहेत त्या स्वतःचें स्वतःच संरक्षण करतात, व या योगें त्या खरोखर स्वर्गही जिंकतात. पतीचा कांहीं कारणानें विरह झाला तर राग न धरतां किंवा वैतागून न जातां पतिव्रता स्त्रिया आपले प्राणांस पातिव्रत्यरूपी कवच घालून त्यांचें रक्षणच करतात.** राज्यभ्रष्ट व सुखभ्रष्ट होऊन मोठ्या बिकट संकटांत सांपडल्यामुळें मूढ होऊन गेलेल्या त्या पुरुषानें तिचा त्याग केला, याबद्दल तिनें रागावूं नये. पोटांत भुकेचें काहूर उठून त्यानें पक्षी धरण्याकरतां वस्त्र त्यांचेवर टाकलें असतां ते वस्त्रासह उडून गेले. अशा प्रकारच्या दारुण आपत्तींच्या वणव्यांत सांपडून पोळल्याकारणानें त्यानें भांबावून जाऊन तसें वर्तन केलें, याचा,

तिनें विषाद मानूं नये. राज्य-भ्रष्ट, तेजोहीन, संकटग्रस्त व क्षुधित झाल्यामुळें त्याचे हातून जें कृत्य घडलें त्याची तिनें कृपाकरून क्षमा करावी." बाहुकाचा हा जबाब ऐकून घेतल्यावर पर्णाद ब्राह्मण त्याचे संबंधानें गुप्तपणें चौकशी करून विदर्भ देशास परत आला, व दमयंतीकडे जाऊन बाहुकानें दिलेलें उत्तर त्यानें निवेदन केलें. तें ऐकून अर्थात् त्या पतिव्रतेच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले- हें उत्तर देणारा पुरुष ऋतुपर्णराजाचा बाहुक नांवाचा सारथि आहे. तो अत्यंत कुरूप असून त्याचा एक बाहु अगदीं आंखूड आहे. तसेंच त्यास अश्वविद्या चांगली अवगत असून पाकशास्त्रांतही तो फार कुशल आहे. अशीही कळलेली माहिती पर्णादानें दमयंतीस कळविली. ती ऐकून दमयंतीस फारच आनंद झाला. तिनें त्या ब्राह्मणास पुष्कळ द्रव्य देऊन त्याच्या उपकाराची कृतज्ञता-पूर्वक फेड केली. एवढेंच नव्हे, तर पतीची व माझी भेट झाल्यावर तुम्हांस आणखी बक्षीस देईन, असेंही तिनें त्यास वचन दिलें. नंतर दमयंतीनें आपल्या मातेकडे येऊन तिला हें सर्व वृत्त निवेदन केलें, आणि नलाला त्वरित विदर्भदेशीं आणण्याचा एक उपाय तिनें तिला सांगितला. अयोध्येंत नलराजा असल्याची लागलेली ही खबर किंवा त्याला आणण्यासाठीं योजलेला एक प्रकारचा साहसी उपाय यांची वार्तासुद्धां भीमराजास कळूं द्यावयाची नाहीं, असा दमयंतीनें आग्रह धरला. त्याप्रमाणें वागण्यास माता कबूल झाल्यावर व सुदेव ब्राह्मणास तेथें बोलावून आणल्यावर तिला दमयंती म्हणाली:—

"आई, हा सुदेव ब्राह्मण फार चांगल्या पायगुणाचा आहे. त्याचे मुळें जसा माझा शोध लागून मी येथें आलें, त्याचप्रमाणें नलाची व माझी भेट करण्याचें मंगलकार्य याचेच हातून पार पडेल. यानें

अयोध्येस सहज गेल्यासारखें करून ऋतुपर्णराजास म्हणावें कीं, "नरवीर नलराजा जिवंत आहे कीं नाहीं, याची वानवाच आहे; तर यापुढें वाट न पाहतां दमयंतीनें स्वयंवरानें पुनः दुसरा पति वरावयाचा निश्चय केला असून अनेक राजे व राजपुत्र विदर्भ राजधानींत जमले आहेत; व उद्यां सकाळींच स्वयंवर समारंभ आहे. शक्य असेल तर महाराजांनीं तिकडे जावें." सुदेव ब्राह्मणानें तेथें असें सांगितल्याबरोबर नलराजा त्वरित इकडे येईल. रथ वायुवेगानें हांकण्याची कला एकट्या नलास मात्र अवगत आहे." दमयंतीच्या या सांगण्याप्रमाणें सुदेवानें अयोध्येंत जाऊन तंतोतंत बतावणी केली. ( वन० अ० ७० )

सुदेवाचें हें भाषण ऐकून ऋतुपर्ण राजा बाहुक सारथ्यास म्हणाला:—'बाहुका, दमयंती पुनः स्वयंवर करणार आहे; त्यासाठीं विदर्भ देशास जाण्याची माझी इच्छा आहे. तूं अश्वविद्येंत कुशल आहेस. तर एक दिवसांत विदर्भ देशास आपणास जातां येईल काय?' राजाचा हा प्रश्न ऐकून नलाचें मन दुःखानें विदीर्ण होऊन तो स्वतःशींच विचार करूं लागला:—"दुखावेगानें मोहित होऊन जाऊन तर दमयंतीनें असें करण्याचें मनांत आणलें नसेल ना? माझ्यासाठींच हा मोठा साहसाचा उपाय तिनें योजला असेल काय? मजवर प्रेम करणाऱ्या बिचाऱ्या दमयंतीचा त्याग करून म्यां दुष्ट, पापी व क्षुद्रबुद्धि पुरुषानें तिचा निःसंशय मोठाच अपराध केला आहे. जगांत स्त्रीस्वभाव चंचल म्हणून प्रसिद्ध आहे; तिच्या संबंधानें घडलेला माझा अपराधही दारुण आहे; शिवाय दीर्घकाळ विरह झाल्यामुळें तिचें मजवरील प्रेमही कदाचित् नष्ट झाल्यामुळें ती पुनः स्वयंवर करीत असेल! पण माझ्या विरहाचे शोकानें

व निराशेनें पूर्ण व्याप्त होऊन गेलेली--विशेषतः एक मुलगा व मुलगी असलेली--दमयंती असें कदापि करणार नाहीं. परंतु, या बातमींत खरें किती आहे व खोटें किती आहे, हें तेथें गेल्यावरच समजेल. ऋतुपर्ण राजाची इच्छा व माझा मनोरथ हीं दोनही आपण साध्य करावीं हें बरें " याप्रमाणें मनाशीं विचार करून एक दिवसांत आपण विदर्भ नगरीला जाऊं शकूं, असें बाहुकानें ऋतुपर्णास उत्तर दिलें; आणि अश्वशाळेंत जाऊन योग्य अश्व निवडून काढण्यासाठीं तो विचार करूं लागला. अखेर त्यानें सिंधुदेशांतले जातिवंत घोडे निवडून काढले. त्यांचे पुठ्ठे मोठे असून तोंडेंही मोठीं होतीं व त्यांचे अंगावर दहा दहा शुभलक्षणी भोंवरे होते. परंतु हे अश्व दिसावयास अत्यंत कृश होते. हे घोडे रथास जुंपून बाहुक आपणास विदर्भ नगरीस एका दिवसांत नेईन म्हणतो, ही निव्वळ थट्टा व फसवणूक आहे, असें वाटून राजानें बाहुकास दरडावलें. परंतु **विपत्तींत सांपडल्यामुळें जरी नलराजास परसेवा करण्याचा प्रसंग आला होता तरी त्यानें आपली निस्पृहता व स्पष्टवक्तेपणा सोडला नव्हता.** त्यानें राजास स्वच्छ उत्तर दिलें कीं, " माझ्या समजुतीनें एक दिवसांत विदर्भ देशास जाण्यास हेच घोडे समर्थ आहेत. तुम्हांस कोणते योग्य वाटतात ते सांगा, तेच मीं रथास जोडतों. " बाहुकाचें हें उत्तर ऐकून ऋतुपर्ण ताळ्यावर आला व म्हणाला:--" अश्वविद्येंत तूंच निष्णात आहेस; तुला वाटतील तेच अश्व रथास जुंपून लवकर चल. " हें ऐकून नलानें वरील लक्षणाचे चार घोडे आणून रथास जोडले; रथांत ऋतुपर्णराजा घाईघाईनें बसला; त्यानें बरोबर वार्ष्णेय सारथिही घेतला होता. सर्वजण बसतांच बाहुकानें रथ हांकण्यास

प्रारंभ केला. घोड्यांस आवरण्याची व हांकण्याची बाहुकाची विलक्षण शिताफी, त्याची एकाग्रता, अश्वांची गति व रथाचा वेग हीं पाहून राजास फार आनंद झाला. पण वार्ष्णेय सारथ्याच्या मनांत निराळेच विचार येऊं लागले. "हा बाहुक प्रत्यक्ष मातली आहे कीं शालीहोत्रच आहे ? रथ हांकण्याचें याचें कौशल्य तर थेट नलराजासारखें दिसत आहे; तेव्हां तो राजाच या बाहुकाचे रूपानें येथें आला नसेल ना ? अश्वविद्या-कौशल्य व वय हीं नलराजा व हा बाहुक यांचीं सारखींच दिसत आहेत. तेव्हां मला आलेला संशय खराही असेल. महात्मे लोक कांहीं कारणानें गुप्त रूपानें या पृथ्वीवर संचार करीत असतात. तेव्हां ह्या बाहुकाच्या कुरूपतेवर जाऊन मीं याचा उपमर्द न करणें हें बरें !" याप्रमाणें नलाचा वार्ष्णेय सारथि विचार करीत असतां नलराजा रथ अतिशय वेगानें हांकीत होता. ( वन० अ० ७१ )

याप्रमाणें अनेक पर्वत, वनें, नद्या ओलांडीत ऋतुपर्णाचा रथ चालला असतां, मध्यंतरीं राजाचें उत्तरीय-वस्त्र रथाखालीं पडलें. तेव्हां राजा नलास म्हणाला:—'हे घोडे थोडा वेळ थांबीव, म्हणजे वार्ष्णेय सारथि खालीं उतरून माझा शेला घेऊन येईल.' हें ऐकून नळानें उत्तर केलें कीं, 'इतकें तुम्हीं बोलेपर्यंत रथ एक योजन दूर आला आहे; वार्ष्णेयास शेला आणतां येणार नाहीं ! ' याप्रमाणें वायुवेगानें रथ चालला असतां ऋतुपर्ण राजास समोर एक बिब्याचें झाड दिसलें. तेव्हां आपलें कौशल्य दाखविण्याची राजास स्फूर्ति होऊन, त्यानें त्या झाडाचीं पानें व फळें इतकीं आहेत, असें बाहुकास सांगितलें; तें ऐकून त्यास फार आश्चर्य वाटलें. त्यानें रथ थांबविला; व प्रत्यक्ष अनुभव पाहण्याकरतां त्या झाडाच्या

दोन फांद्या तोडल्या व ' यांचीं पानें व फळ किती आहे. तीं नेमकीं सांगा पाहूं; मी प्रत्यक्ष तीं मोजूनच पाहतों ' असें राजास म्हटलें. ऋतुपर्णराजा विदर्भदेशास जाण्यास फार उत्सुक झाला होता. त्यास वाटेंत होणारा हा खोळंबा आवडला नाहीं. तेव्हां पुनः नलाचें गुप्त राजतेज चमकून " तुम्हांस उशीर होत असला तर वार्ष्णेयास सारथि करून खुशाल विदर्भ देशाचे राजधानीस जावें " असा त्यानें खडखाडित जबाब दिला. तेव्हां भांगासुरी ऋतुपर्ण पुनः मऊ येऊन बाहुकाचे मर्जीप्रमाणें वागण्यास तयार झाला. बाहुकानें तोडलेल्या दोनही फांद्यांचीं पानें व फळें किती आहेत तें राजानें सांगितलें; व बाहुकानें मोजून पाहतां तीं नेमकीं तितकींच भरलीं ! ही आश्चर्यकारक विद्या आपणास मिळावी, अशी बाहुकास इच्छा झाली; व तिचे मोबदला तो आपली अश्वविद्याही राजास शिकविण्यास तयार झाला. विद्येचें व विदर्भ देशास जाण्याच्या कार्याचें महत्त्व जाणून ऋतुपर्णराजानें ' अक्षहृदय विद्या ' बाहुकास दिली; व बाहुकानें ' अश्वहृदय विद्या ' राजास शिकविली. अक्षविद्या नलास येतांच त्याचे शरीरांत गुप्तपणें राहिलेला कलि बाहेर पडला; व अंगांत भिनलेलें कर्कोटक विष ओकूं लागला ! कलीस पाहतांच नलानें त्यास शाप देण्याचा विचार केला. परंतु कलि त्यास दीनवाणीनें म्हणाला—
" मी भयभीत होऊन तुला शरण आलों आहें; मला शाप देऊं नको. दमयंतीचा तूं त्याग केल्यानंतर तिनें संतप्त होऊन मला जे शाप दिले त्यामुळें तुझे शरीरांत मी मोठ्या कष्टानेंच राहत होतों. त्यांतच कर्कोटकाचें विष मला सारखें जाळीत होतें. त्यांतून सांप्रत तूं मला मुक्त केलें आहेस; तर आतां शाप न देतां जर तूं

मला सोडशील तर तुझी कीर्ति गाणारांस माझ्यापासून भय प्राप्त होणार नाहीं." प्रत्यक्ष शत्रु हातीं सांपडला असतांही त्याला क्षमा करून त्यांतले त्यांत लोकोपकारही साधतो, असें पाहून नलानें सूड उगविण्याची आपली बुद्धि व क्रोध आवरून धरला व कलीस जाऊं दिलें. हें सर्व होतांच कलीनें त्या बिब्याच्या झाडाचा आश्रय केला; म्हणून तेव्हांपासून हें झाड लोकांत 'अप्रशस्त' मानण्यांत येऊं लागलें. ज्याच्यामुळें नलराजावर इतके अनर्थ व संकटें येऊन कोसळलीं, तो कलि त्याचें शरीर सोडून निघून गेल्यावर बाहुकाच्या त्या कुरूप तोंडावरही विलक्षण तेज चमकूं लागलें. कलि निघून गेल्याचे व अक्षहृदयविद्या प्राप्त झाल्याचे आनंदांतच बाहुक रथांत बसला; व पहिल्यापेक्षां अधिक वेगानें रथ हाकूं लागला! (वनपर्व, अ० ७२)

याप्रमाणें मार्गक्रमण करीत असतां पूर्वीं वचन दिल्याप्रमाणें सूर्य अस्तास जाण्यापूर्वींच बाहुकानें ऋतुपर्ण राजाचा रथ कुंडिनपुराबाहेर आणला. अयोध्येचा राजा भांगासुरि ऋतुपर्ण हा आला आहे, अशी राजवाड्यांत वर्दी पोंचतांच भीमकराजानें परवानगी दिली. लवकरच ऋतुपर्णाचा रथ मेघांच्या गडगडाटासारख्या आपल्या गंभीर ध्वनीनें दशदिशा दणाणित राजरस्त्यांतून राजवाड्याकडे येऊं लागला. रथाचा हा आवाज ऐकून मयूरपक्षी व हत्ती यांस मेघाचा भास होऊन त्यास त्यांनीं उलट आरडून प्रत्युत्तर दिलें. नलाचीं मुलें ज्या रथांतून आलीं होतीं त्या रथाच्या घोड्यांनीं तर हा रथाचा ओळखीचा ध्वनि ऐकून आनंदानें खिंकाळण्यास सुरुवात केली. अंतःपुरांत शोक करीत बसलेल्या दमयंतीनें तर, नलराजा रथ हांकीत असल्याशिवाय रथाचा असा आवाज व्हावयाचाच नाहीं, असें तत्क्षणींच ओळखलें; व रथाचा

घडघड आवाज ऐकल्याबरोबर तिचें हृदयही उचंबळून येऊन धडधडूं लागलें! ती म्हणाली:—"दशदिशा दणादणून व भरून टाकणारा हा रथध्वनि ज्या अर्थीं माझें हृदय आल्हादवीत आहे, त्या अर्थीं हा नलराजाच आला असला पाहिजे. अहोरात्र त्याच्या सद्गुणांचें स्मरण व चिंतन करीत शोक करतां करतां माझें हृदय विदीर्ण झालें आहे. हा नलराजा जर आज मजकडे येणार नाहीं, आज जर त्याची माझी भेट होऊन त्यास दृढ आलिंगन मला देतां येणार नाहीं, तर मी कांहीं हे प्राण ठेवणार नाहीं; मीं अग्निप्रवेश करीन." याप्रमाणें प्रेमाच्या, दुःखाच्या व निराशेच्या आवेशांत--किंबहुना एक प्रकारच्या वेडांत--मोठ्यानें बडबडत नलास पहाण्यासाठीं ती राजवाड्याच्या गच्चीवर गेली. तों मधल्या चौकांत नुकताच येऊन उभा राहिलेला रथ तिचे दृष्टीस पडला. बाहुक व वार्ष्णेय हे सारथि प्रथम रथांतून खालीं उतरले; व त्यांनीं घोडे सोडून नेऊन अश्वशाळेंत बांधले. मागाहून ऋतुपर्णराजाही रथांतून उतरून भीमराजाचे भेटीस गेला; भीमानेंही त्याचा चांगला सत्कार केला. कुंडिनपुरांत किंवा राजवाड्यांत स्वयंवराची कांहींच गडबड नाहीं व राजे, राजपुत्रही कोणी आलेले नाहींत; असें पाहून ऋतुपर्णराजा आश्चर्यचकित झाला व बराच गोंधळूनही गेला. कोणत्या कार्यास्तव कुंडिनपुरास आलांत? असा भीमराजानें प्रश्न विचारला असतां, त्याचेंही समर्पक उत्तर ऋतुपर्णास देतां येईना. 'मी केवळ आपले दर्शनास व समाचारास आलों आहें, दुसरें कोणतेंही कार्य नाहीं.' असें कांहींतरी बोलून त्यानें ती वेळ मारून नेली. अयोध्येपासून कुंडिनपुरापर्यंतचा शंभराहून अधिक योजनांचा प्रवास एक दिवसांत घाई घाईनें उरकून

जो राजा येथें आला, तो केवळ आपली औपचारिक भेट किंवा समाचार घेण्यासच आला आहे, हें भीमराजास खरें वाटेना. तथापि या गूढाचा उदयिक उलगडा करून घेऊं, असा मनाशीं विचार करून ' तुम्हांस फार श्रम झाले आहेत, आतां स्वस्थ विश्रांति घ्यावी ' असें म्हणून त्यानें ऋतुपर्णराजास निरोप दिला; व त्याची राहण्याची वगैरे सर्व तजवीज दुसऱ्या एका राजवाड्यांत करून दिली. वार्ष्णेय सारथ्यासह ऋतुपर्ण राजा निघून गेल्यावर बाहुकानें तो रथ रथशाळेमध्यें आणला; दमलेल्या घोड्यांची शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें त्यानें चाकरी करून त्यांचा श्रम-परिहार केला; व नंतर तो त्या रथांतच येऊन पडला. गच्चीवर येऊन हा सर्व प्रकार पाहत बसलेल्या दमयंतीनें ऋतुपर्ण राजा, वार्ष्णेय सारथि व कुरूप बाहुक जेव्हां पाहिला, तेव्हां तिला अतिशय आश्चर्य वाटलें. " नलाच्या रथाच्या ध्वनीसारखाच थेट आवाज होऊनही या तिघांत नल तर दिसत नाहीं हें कसें ? नलाप्रमाणेंच ह्या वार्ष्णेय सारथ्यानेंही कदाचित् अश्वविद्या संपादली असेल काय ? किंवा कदाचित् अश्वविद्येंत हा ऋतुपर्णराजाही नलाइतकाच श्रेष्ठ व निष्णात असेल काय ? " याप्रमाणें तर्कवितर्क व संशय यांचें दमयंतीच्या मनांत काहूर उठलें. त्याचें निरसन करण्यासाठीं व ऋतुपर्णाचे बरोबर नल आला आहे कीं नाहीं, याचा तपास करण्यासाठीं दमयंतीनें केशिनीनामक आपली एक हुशार दासी खालीं पाठवून दिली. ( वनपर्व, अ० ७३ ) थोट्या हाताच्या, व कुरूप आणि रथांत निजलेल्या बाहुकाला पाहून ज्या अर्थी मनाला संतोष व हृदयाला आनंद होत आहे त्या अर्थी तो नलराजाच असावा, असा दमयंतीस बळकट संशय आला होता;

व या संशयाचे निराकरणासाठींच तिनें आपल्या दासीला खालीं पाठविलें होतें. दासीला बाहुकाकडे पाठवून दमयंती काय प्रकार होतो तो पाहण्यासाठीं पुनः गच्चीवर निघून गेली. केशिनीनें खालीं येऊन बाहुकास कुशलप्रश्न विचारल्यानंतर उभयतांचा पुढील प्रमाणें संवाद झाला:—"तुम्ही अयोध्येहून केव्हां निघालांत? व येथें तुम्ही येण्याचें प्रयोजन कोणतें? हें जाणण्याची दमयंतीची इच्छा आहे." बाहुक:—"दमयंतीचें उद्यां दुसरें स्वयंवर होणार आहे, असें ब्राह्मणाचे तोंडून ऋतुपर्णराजानें ऐकिलें; व तें ऐकून वायूसारखे वेगवान् चार अश्व रथास जोडून राजा इकडे आला आहे व मी त्याचा सारथि आहें." केशिनी:—"तुमच्या बरोबरचा तिसरा पुरुष कोण आहे? व तुम्ही कोण आहां? तुम्ही हा धंदा कां करूं लागलां?" बाहुक:—"तिसरा पुरुष वार्ष्णेय असून तो पुण्यश्लोक नलराजा निघून गेल्यापासून ऋतुपर्णराजाचे नोकरीस येऊन राहिला आहे. मीही अश्वविद्या व सूपशास्त्र यांत निष्णात आहें, असें जाणून राजानें मला आपल्या पदरीं ठेवून घेतलें आहे; व मला सारथ्य आणि पाकक्रिया हीं कामें सांगितलीं आहेत." केशिनी:—"नलराजा कोणीकडे गेला, हें ह्या वार्ष्णेयास माहीत आहे काय? तो तुम्हांपाशीं यासंबंधानें कांहीं बोलला काय?" बाहुक:—"नलाचीं दोनही मुलें येथें ठेवून लागलीच वार्ष्णेय वाट फुटेल तिकडे निघून गेला; त्याला नलाची कांहींएक वार्ता माहीत नाहीं. किंबहुना दुसऱ्या कोणत्याही पुरुषास नल कोठें आहे हें माहीत नाहीं. कारण आपलें खरें स्वरूप नष्ट झालेला असा तो गुप्तरूपानें या पृथ्वीवर संचार करीत आहे. नलाचा आत्मा मात्र त्यास जाणीत आहे; पण नल मात्र आपल्या स्वाणा-

खुणा केव्हांही कोणास सांगत नाहीं." केशिनी:—"पूर्वी अयोध्येला येऊन एका ब्राह्मणानें एका स्त्रीचे उद्गार बोलून दाखविले, व त्यास तुम्हीं जबाब दिला; तो पुनः तुमचे तोंडून ऐकण्याची दमयंतीस फार उत्कंठा लागली आहे." असें म्हणून केशिनीनें पर्णाद ब्राह्मणाप्रमाणें पुनः त्या श्लोकांचा उच्चार केला. केशिनीचें हें भाषण व ते श्लोक ऐकून बाहुकाचें हृदय दुःखशोकानें भरून आलें व त्याचे डोळे अश्रूंनीं डबडबले. तथापि आपलें दुःख तसेंच दाबून बाहुकानें पर्णाद ब्राह्मणास जो जबाब दिला होता, तोच पण विशेष गहिंवरून व कंठ दाटून येऊन या वेळींही त्यानें केशिनीस दिला. परंतु जबाब संपावयाचे वेळेस मात्र त्याला आपलें दुःख आवरतां येईना, व तो अश्रु ढाळून मोठ्यानें शोक करूं लागला ! ! केशिनीनें वर जाऊन बाहुकाशीं झालेलें सर्व संभाषण व त्याचे अखेर त्याची झालेली स्थिति दमयंतीस निवेदन केली. (वन० अ० ७४) तीवरून बाहुक हाच नल, असा तिचा संशय जास्तच दृढ होऊं लागला. तथापि दमयंतीनें पुनः केशिनीस त्याजकडे पाठवून, त्याच्या विशेष आश्चर्यकारक कृती, चेष्टा व खाणाखुणा लक्ष्यपूर्वक पाहण्याची तिला आज्ञा केली. बाहुकानें राजवाड्यांतून विस्तव किंवा पाणी मागितलें तरी त्यास देऊं नये, अशीही तिनें तजवीज ठेवली. आज्ञेप्रमाणें केशिनी बाहुकाकडे येऊन बराच वेळ मुकाट्यानें त्याजकडे लक्ष देऊन बसली. तेव्हां, तिच्या असें ध्यानांत आलें कीं, बाहुकाचा आचार अति निर्मळ व स्वच्छ आहे. लहान दार असलें तरी तो त्यांतून मान न वांकवितां जातो; कारण त्यास पाहतांच द्वारच आपोआप मोठें होतें ! गवताची मूठ हातांत घेऊन त्यानें सूर्यास दाखविली कीं ती पेटते, व त्या विस्तवानें त्याचें

अंग मुळींच भाजत नाहीं ! ऋतुपर्णाच्या स्वयंपाकघरांत ठेवलेले कुंभांकडे यानें एकदां नजर फेंकली कीं ते पाण्यानें तुडुंब भरतात ! बाहुकानें ताजीं फुलें घेऊन हातानें कितीही चुरडलीं तरी तीं पूर्ववत् ताजीं, सतेज व सुगंधिच राहतात ! वगैरे जे आश्चर्यकारक व दैवी चमत्कार केशिनीस दिसले ते तिनें दमयंतीकडे येऊन तिला निवेदन केले. तिचे आज्ञेवरून पुनः ती ऋतुपर्णाचे स्वयंपाक घरांत आली; व बाहुकानें शिजवून तयार केलेलें कांहीं मांस त्याचा डोळा चुकवून उचलून नेऊन केशिनीनें दमयंतीस दिलें. तें खाऊनही नलाच्या हातच्या पूर्वीं खालेल्या मांसाची तिला आठवण होऊन तिची जास्त जास्तच खात्री होत चालली. अखेर दमयंतीनें आपला मुलगा व मुलगी बरोबर देऊन केशिनीस पुनः बाहुकाकडे पाठविलें. इंद्रसेन व इंद्रसेना यांस पाहतांच बाहुकाचें हृदय उचंबळून आलें. व आपण काय करतों याचें भान न राहून त्यानें धांवतच जाऊन त्या मुलांस पोटाशीं धरलें व त्यांस आपल्या मांडीवर बसविलें; आणि तशा स्थितींत मोठ्यानें गळा काढून बराच वेळ रडला ! आपल्या खऱ्या स्थितीची तो आठवण होतांच बाहुकानें मुलें मांडीवरून खालीं उतरविलीं; व तो केशिनीस म्हणालाः—“ माझ्या मुलांसारखीं हीं मुलें दिसलीं, म्हणून त्यांस पाहतांच मला प्रेमाचें भरतें येऊन मीं शोक केला. तूं वरचेवर माझेकडे येत आहेस, याचा लोक भलताच अर्थ करून मजविषयीं विनाकारण संशय घेतील. आम्ही आपले परदेशचे पाहुणे आहों; तर तुला नमस्कार असो, तूं आतां येथून निघून जा. ” ( वनपर्व, अ० ७५ )

इंद्रसेन व इंद्रसेना या मुलांस पाहून बाहुकाची काय अवस्था झाली व त्यांस आपल्या मांडीवर घेऊन त्यानें किती शोक केला, तें सर्व केशिनीनें दमयंतीस कळविलें. तेव्हां मात्र तिला धीर धरवेना. तिनें त्याच पावलीं केशिनीस आपल्या आईकडे पाठविलें; व ' बाहुक हाच नलराजा असावा, अशी शंका येऊन मीं त्याची पुष्कळ प्रकारें परीक्षा केली, त्यावरून मला आलेला संशयच खरा-आहे, अशी माझी बहुतेक खात्री झाली आहे. परंतु त्याचे रूपाबद्दलचा मात्र अजून थोडा संशय आहे. त्याबद्दल मला स्वतःच खात्री करून घेणें आहे. तर त्यास माझ्याकडे येण्याची किंवा मला त्याजकडे जाण्याची परवानगी दे. ही गोष्ट तूं बाबांस कळवून कर किंवा त्यांस न कळत कर. ' असा निरोप तिजकडून आपल्या मातेस कळविला. तिनें भीमराजाचे परवानगीनें बाहुकास दमयंती राहत होती त्या वाड्यांत पाठविलें. तेथें आल्यावर, वेणीच्या जटा झालेली, सर्वांग मलिन असलेली आणि नलानें कापलेलेंच अर्धें वस्त्र—पण तें भगवें करून—नेसलेली अशी दमयंती दृष्टीं पडतांच बाहुकाचें हृदय दुःखातिशयानें भरून येऊन त्याचे डोळ्यांतून अश्रूंचा लोट वाहूं लागला. बाहुकाची ही स्थिति पाहून दमयंतीचे आंतड्यांस पीळ पडून तिलाही रडें कोसळलें. कांहीं वेळानें तशीच रडत व हुंदके देत दमयंती बाहुकास म्हणाली:—" आपली प्रिय व निरपराधि आणि पतिव्रता भार्या श्रमानें व्याकुल होऊन निजली असतां तिला एकटीला निर्जन अरण्यांत टाकून जाणारा नलावांचून दुसरा धर्मज्ञ पुरुष, बाहुका, तुम्हीं पूर्वीं कधीं पाहिला किंवा ऐकिला आहे काय ? मीं असा त्यांचा कोणता बरें अपराध केला होता कीं, त्यांनीं माझा असा त्याग केला ? साक्षात् देवांचा त्याग

करून त्यांचे समक्ष मीं नलराजास वरिलें; व तेव्हांपासून मीं त्यांजशीं निःसीम प्रेम करणारी पतिव्रता या नात्यानेंच वागलें. अशा मला—विशेषतः पुत्र-कन्या असलेल्या मला—त्यांनीं असें कसें टाकलें ? देवांसमक्ष ' मीं तुजशीं सत्यपणानें वागेन ' असें मला जें अभिवचन दिलें होतें तें त्याग करते वेळीं कोठें बरें गेलें ? " अश्रु ढाळीत दमयंतीनें काढलेले हे दुःखाचे उद्गार ऐकून बाहुकास अतिशय वाईट वाटलें. दमयंती जरी त्याशीं तिऱ्हाईताप्रमाणें बाहुक व नल निराळे अशा झोंकानें बोलत होती, तरी यापुढें तिला जास्त संशयांत ठेवणें बरें नव्हे, असें वाटून बाहुक नल या नात्यानेंच तिजशीं बोलूं लागला. तो म्हणालाः—" द्यूतांत जें मीं राज्य गमावलें किंवा निर्जन वनांत जो मीं तुझा त्याग केला, तें मीं केलें नसून तो सारा कलीचा प्रभाव होता. माझ्या विरहानें वेडी होऊन तूं शाप दिल्यापासून कलि माझ्या शरीरांत मोठ्या दुःखानें आगींत सांपडल्याप्रमाणें राहत होता. अखेर मीं आपल्या उद्योगानें व तपानें त्यास जिंकलें, तेव्हां तो मला सोडून गेला; त्या वेळेपासूनच आपणां दोघांचें दुःख संपलें, असें मला वाटलें. कलीनें सोडल्यानंतर मी केवळ तुझ्याकरतांच इकडे आलों. तुजवांचून येथें येण्याचें आमचें दुसरें प्रयोजनच नाहीं. पण आपणावर निःस्सीम प्रेम करणाऱ्या व एकपत्नीव्रत पाळणाऱ्या आपल्या पतीस सोडून, तुजप्रमाणें कोणती स्त्री दुसऱ्या पतीस वरील ? एकाद्या कामुक स्वैरिणीप्रमाणें दमयंती पुनः स्वयंवर करून आपणास अनुरूप असा दुसरा पति करणार आहे, अशा प्रकारें सर्व देशांत सांगत तुमचे दूत फिरत आहेत; व ह्यांपैकीं एका दूताचें बोलणें ऐकूनच भांगासुरी ऋतुपर्णराजा अयोध्ये-

हून येथें आला आहे." नलास त्वरित आपणाकडे आणण्यासाठीं आपण जो साहसाचा उपाय योजला तो आपल्याच गळ्यांत येतो, असें पाहून दमयंती घाबरून गेली. त्याच्या रूपाची परीक्षा करण्याचा तिचा बेतही जागचे जागीं राहिला; व ती भीतीनें कांपत कांपत हात जोडून नलास म्हणाली:—"महाराज, मजविषयीं विनाकारण शंका घेऊन मला दोष देऊं नका. मीं प्रत्यक्ष देवासही सोडून आपणास वरिलें आहे. आपला शोध करण्यासाठीं मीं सर्वत्र ब्राह्मण पाठविले व मीं त्यांस श्लोक सांगून ते चोहोंकडे म्हणण्याची विनंति केली. तीप्रमाणें पर्णाद ब्राह्मण कोसल देशांत जाऊन ऋतुपर्णाचे दरबारांत ते श्लोक म्हणाला असतां आपण त्यांस योग्य प्रत्युत्तर दिलें. आपणावांचून दुसरा कोणीही पुरुष एका दिवसांत शंभर योजनें रथ आणूं शकणार नाहीं, हें जाणून आपणास आणण्यासाठीं स्वयंवराची खोटीच बातमी सांगविण्याचा उपाय मीं योजला.

स्पृशेयं तेन सत्येन पादावेतौ महीपते ।
तथा नासत्कृतं किंचिन्मनसाऽपि चराम्यहम् ।।

**आपण म्हणतां तो पापविचार माझे मनासही शिवला नाहीं; हें मी, महाराज, या पायांवर हात ठेवून व त्यांची शपथ घेऊन खरें सांगतें!** त्रैलोक्याच्या पापपुण्याचे साक्षी व त्र्यैलोक्यास आधारभूत असलेले वायु आणि सूर्य-चंद्र हे, माझे मनास पापाचा स्पर्शही झाला असेल तर, माझे प्राण तात्काळ हरण करोत." दमयंतीनें याप्रमाणें भाषण करतांच वायु आकाशवाणीचे रूपानें म्हणाला:—"नलराजा, मी तुला खरें सांगतों कीं, दमयंतीचे मनांत पापबुद्धि मुळींच आलेली नाहीं. उलट



दमयंतीनें नलास घट्ट मिठी मारिली.

पृष्ठ ६९.

न तीन वर्षें तिनें आपल्या शीलाचें व पातिव्रत्याचें भांडार या दक्षतेनें संरक्षण केलें आहे आणि या गोष्टीचे शी व साहाय्यकर्ते आम्हीच आहों. तुला त्वरित आणण्या- ी स्वयंवराचा तिनें निवळ बहाणा केला होता. दमयंती तुला आहे व तूंही दमयंतीस योग्य आहेस. या बाबतींत शंका रतां तूं भार्येचा स्वीकार कर." ही आकाशवाणी होतांच काशांतून पुष्पवृष्टि झाली, देवांच्या दुंदुभि वाजूं लागल्या आणि ा मंद व मंगल असा वाहूं लागला! हा चमत्कार पाहून च्चा संशय दूर झाला, त्यानें दमयंतीस आपल्याजवळ घेऊन कानें दिलेलें वस्त्र पांघरून त्याचें स्मरण केलें. तों बाहुकाचें प जाऊन तो पूर्वीचा सुस्वरूप नलराजा झाला! तें पाहून यंतीनें नलास घट्ट मिठी मारली; व दुःखानें तुंबून गेलेलें हृदय ळें करून मोठ्यानें रडूं लागली. नलानेंही दमयंतीस आलिंगन न आपल्या मुलास व मुलीस पोटाशीं धरलें. भगवें अर्धें वस्त्र लेल्या व मलिन अशा आपल्या पत्नीस आलिंगून नलराजा च वेळ उभा आहे, तीही त्याचे छातीवर डोकें ठेवून अश्रु ळीत सारखे हुंदके देत आहे, आणि दोघेंही आपल्या पुत्रास व न्येस वारंवार पोटाशीं धरीत आहेत, असा हृदयद्रावक प्रकार राच वेळ चालला होता! दमयंतीच्या आईनें ही सर्व हकीकत ठ्या आनंदानें भीमराजाकडे जाऊन निवेदन केली; त्यासही मतिशय आनंद होऊन आतां उदईकच आपण नलदमयंतीस भेटूं, असें त्यानें ठरविलें. एकमेकांचा विरह झाल्यापासून वनामध्यें एक- मेकांवर कोणकोणतीं संकटें व दुःखें आलीं; व पुढेंही ३ वर्षांच्या विरहा- वस्थेचे दिवस एकमेकांनीं कसे काढले, हें एकमेकांस सांगण्यांतच

दमयंती व नल यांची ती रात्र निघून गेली ! अर्धवट पीक य
पाऊस नाहींसा होऊन तें करपून जाण्याचा प्रसंग यावा, व
क्यांत पुनः पाऊस पडून पीक पुनः थरारून यावें व धरि
आनंद व्हावा, त्याप्रमाणें या वेळीं दमयंतीची स्थिति इ
( वनपर्व अ० ७६ )

प्रातःकाळीं लवकर उठून नल व दमयंती यांनीं तीन वर्षां
विरहावस्थेंतील आपला वेष टाकून उत्तमोत्तम वस्त्रभूषणें धा
केलीं व तीं दोघें मुलांसह येऊन भीमराजास भेटलीं. प्रथ
नलानें व दमयंतीनें भीमास पूज्य-भावपूर्वक नमस्कार के
भीमानेंही जणूं आपल्या पोटचा पुत्रच पुनः भेटला, अशा प्रे
नलाचा सत्कार व स्वागत केलें. नलराजा प्रगट झाल्याची व
कळतांच सर्व कुंडिनपुरवासीयांस अतिशय आनंद झाला. न
रांत त्यांनीं पताका व ध्वज लावून आणि पुष्पमाला बांधून आ
पलीं घरें शृंगारलीं; राजरस्ते पाण्यानें शिंपून तेही पुष्पांनीं भू
केले; आणि सर्व देवालयांतही उत्सव व पूजाअर्चा करण्यांत आल
आपल्या पदरीं असलेला बाहुक हा खरोखर नलराजा असून
प्रगट झाल्याचें वर्तमान ऐकून ऋतुपर्णासही हर्ष झाला, व त्य
नलाकडे येऊन त्याची भेट घेतली. " मजजवळ आज्ञातवास
असतांना मजकडून अज्ञानानें किंवा बुद्धिपूर्वक जर कांहीं तुमच
अपमान किंवा अपराध झाला असेल, तर त्याची क्षमा करावी.
असें ऋतुपर्णराजा नलास म्हणाला. तेव्हां त्यानें उत्तर दिलें:—
" छे, छे, तुम्हीं माझा अपराध तर केला नाहींच; पण उलट
मी स्वतःचे राजवाड्यांत असल्याप्रमाणें तुमचे घरीं सुखानें राहिलों.
तुम्ही माझे पूर्वीपासूनच मित्र व संबंधी आहां; या आज्ञात-

नें तर आपला स्नेहसंबंध अधिक दृढच झाला आहे."
माणें भाषणें होऊन उभयतां आनंदांत असतां अश्वविद्या व
विद्या यांचीं पूर्वीं सांगावयाचीं राहिलेलीं अत्यंत गूढ रहस्यें नल
ऋतुपर्ण यांनीं एकमेकांस सांगितलीं. पुढें लवकरच दुसरा सारथि
न ऋतुपर्णराजा अयोध्येस परत गेला तो गेल्यावर नलराजा
डिनपुरास फक्त एकच महिना होता. ( वन० अध्याय ७७ ).

महिन्यानंतर एक शुभ्र रथ, १६ हत्ती, ५० घोडेस्वार व
०० पायदळ एवढाच अल्प परिवार बरोबर घेऊन नलराजा
ापल्या निषध देशांत गेला; आणि राजधानीबाहेरून त्यानें
करास निरोप पाठवून बोलावून आणलें; व तो त्यास म्हणाला:-
पुष्करा, मीं पुष्कळ धन मिळवून आणलें आहे; शिवाय दमयंतीही
जपाशीं आहे. त्यांचा पण लावून आपण पुनः द्यूत खेळूं या, मला
फार उत्कंठा लागली आहे. किंबहुना प्राणांसह सर्वस्वाचा
कच पण लावून आपण पुनः द्यूत खेळूं. तुला द्यूत खेळाव-
ाचें नसेल तर मी तुला युद्धद्यूतास आव्हान करतों. त्यांत तुझा-
री नाश होईल किंवा माझा तरी होईल.

वंशभोज्यमिदं राज्यमर्थितव्यं यथातथा ।
येन केनाप्युपायेन वृद्धानामितिशासनम् ॥

**हें राज्य एका पुरुषाचें नसून एका राजवंशाचें आहे.
या वंशांतील कोणत्याही पुरुषानें वाटेल तो उपाय योजून
व शक्य तो उद्योग करून तें मिळवावें, अशी वृद्धांची आज्ञा
आहे.** द्यूत किंवा युद्ध यांपैकीं कोणतें तरी एक करण्याचा निश्चय
कर." नलाचें हें भाषण ऐकून पुष्करास आनंदच झाला. द्यूतांत
आपण नलास सहज जिंकूं असें वाटून हंसत हंसत पुष्कर त्यास

म्हणाला:—" पुष्कळ धन मिळवून तुम्ही परत आलां, व दम चेंही दुर्दैव संपून ती तुम्हांस प्राप्त झाली, ही मोठ्या आनं व सुदैवाची गोष्ट आहे. दमयंतीवर माझें मन बसलें असून सदैव तिचेंच चिंतन करीत असतों. स्नेह्याशीं द्यूत खेळण्यांत नसते. तुझ्यासारख्या प्रतिपक्षीयाशीं व त्यांतही दमयंतीसा स्त्रीचा पण लावून द्यूत खेळण्यांतच खरा आनंद आहे. या तुझें हें धन व भार्या मीं जिंकीन, आणि त्याच धनानें अलं केलेली दमयंती माझ्या सेवेस येईल; तेव्हांच मी आपणास कृतकृ समजेन." पुष्कराचें हें नीचपणाचें भाषण ऐकून तरवारीनें त्य एकदम शीर उडवावें, असें अतिशय संतापामुळें नलास वाट परंतु आपल्या कार्याकडे नजर देऊन व स्वतःच्या सामथ्य वर विश्वास असल्यामुळें त्यानें आपला क्रोध आवरून धरल त्यानें त्यास एवढेंच म्हटलें कीं " उगीच बडबड क भू द्यूतास आरंभ कर; द्यूतांत पराभूत झाल्यावर मग तु असले हलकट शब्द पुनः उच्चारूं शकणार नाहीं." इतकें बोल झाल्यावर नल व पुष्कर यांचें द्यूत सुरू झालें. पहिल्याच डावांत नलानें पुष्करास सहज जिंकलें. तेव्हां नलराजा स्मित करून त्यास म्हणाला:—" निषध देशाचें हें सर्व निष्कंटक राज्य अ अविच्छिन्न माझें झालें आहे. राजाधमा, यापुढें वैदर्भी तुझ्या दृष्टीस पडणेंही अशक्य आहे! मूर्खा, तूं आतां आपल्या परिवारासह तिचा दास झाला आहेस, हें लक्षांत ठेव." इतकें बोलून नलानें आपल्या भावाचें तोंडानें उसनें फेडून घेतलें. पण किती केलें तरी पुष्कर हा आपला भाऊ आहे, व त्यानें आपला जो छल केला त्याचा दोष कलीकडेच विशेष आहे, हें जाणून,

प्रत्यक्ष प्राण जरी नलाचे हातीं आले होते तरी ाचा फायदा घेतला नाहीं. तो पुष्करास म्हणाला:—
जं तूं मला द्यूतांत जिंकलेस तें तुझें कृत्य नसून तो प्रभाव होता; अर्थात् त्याचा दोष मी विनाकारण तुजवर ईत नाहीं. मी तुला जीवदान देतों; एवढेंच नव्हे, तर तुझें धन व राज्याचा हिस्साही मीं तुला दिला आहे. पुष्करा, तूं शा भाऊ आहेस व मी तुजवर भावाप्रमाणेंच प्रेम करीत आहें करीन. तूं सुखानें शंभरवर्षेपर्यंत राज्यसुख भोग." नलराजाचें भाषण ऐकून पुष्कर खजिल व लज्जित झाला. पण एकंदरीनें ास आनंद होऊन तो त्याजजवळ एक महिनाभर राहून आपल्या गरास निघून गेला. तो गेल्यानंतर नलराजानें आपल्या राजधा- ांत समारंभानें व थाटानें प्रवेश केला. नागरिकांनीं नगर अत्त्युत्तम तीनें शृंगारून मोठा उत्सव केला. नलानेंही त्या सर्वांच्या भेटी ऊन त्यांचा सत्कार व सांत्वन केलें. नगरांतील उत्सव संपल्यावर लानें मोठें सैन्य दमयंतीला आणण्यासाठीं कुंडिनपुरास पाठविलें. ीमराजानेंही तिला पाठवणीच्या मोठमोठ्या बहुमोल देणग्या देऊन ची मुलांसह रवानगी करून दिली. ती पुनः परत आपल्या राज- नींत आल्यावर नलास व प्रजाजनांस जो आनंद झाला तो ़ नीय होय. तिजसह सुखानें कालक्रमणा करीत नलानें पूर्ववत् ाानुसार निषध देशाचें बहुत वर्षें राज्य केलें.

विषमावस्थिते दैवे पौरुषेऽफलतां गते।
विषादयंति नात्मानं सत्वापाश्रयिणो नराः॥

ैव विपरीत झालें असतां व पुरुष-प्रयत्नाची गति कुंठित ोऊन ते निष्फळ झाले असतां, महात्मे पुरुष आपल्या

मनास विषाद वाटूं न देतां, आपलें सत्व कदापि ढ नाहींत. हें नलदमयंती-चरित्राचें रहस्य, धर्मराजास ही क णाऱ्या बृहदश्वऋषींचे तोंडून व्यासांनीं वदविलें आहे. *
अ० ७८-७९ )

REFBK-0000860

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्र. क्र.
शाखा

* या कथेची फलश्रुति म्हणून सांगितलेला खालील श्लोक सुप्रसि आहे:—

कर्कोटकस्य नागस्य दमयंत्या नलस्य च ।
ऋतुपर्णस्य राजर्षेः कीर्तनं कलिनाशनम् ॥